म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
नं. ७१५३८



REFBK-0006158

श्री सयाजी बालज्ञानमाला पुष्प १६५ वे

श्री सयाजी साहित्यमाला पुष्प १६५ वें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ........................ दि
1536

# म

REFBK-0006158

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ६१५८

लेखक :

**वि. स. वाकसकर,** बडोदें

राधेय कर्ण चरित्र, अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रें, शिवाजी व शिवकाल ९१ कलमी बखर, तंजावरचे मराठे राजे, दरुणी महाल, बडोदें राज्यदप्तरांतील ऐतिहासिक वेचे (खास हुकुमानें संशोधिलेले) इ० ग्रंथांचा कर्ता

आवृत्ति १ ली सन १९४१

प्रती १००० किंमत ६ आणे

प्रकाशक :

वि. स. वाकसकर,

रावपुरा, बडोदें.

मुद्रक :

पुरुषोत्तम आत्माराम चित्रे, बी. ए.,

आत्माराम प्रेस, खारीबाव, बडोदें.

श्री

# विज्ञापना

आपल्या देशी भाषांतील साहित्याची अभिवृद्धि करण्याच्या सद्धेतूनें विद्याभिलाषी कै. श्रीमंत सरकार महाराजसाहेब सर सयाजीराव गायकवाड, सेनाखासखेल, समशेरबहादूर, जी. सी. एस्. आय्., जी. सी. आय्. ई., एल्एल्. डी., यांनीं कृपावंत होऊन दोन लक्ष रुपयांची जी रक्कम निराळी ठेविली आहे, तिच्या व्याजांतून "श्रीसयाजी बालज्ञानमालें"त विविध विषयांवर पुस्तकें तयार करण्यांत येत असतात.

तदनुसार **मलिक-अंबर** या नांवाचा ग्रंथ श्री. **वि. स. वाकसकर** यांजकडून तयार करविला, तो उक्त मालेंतून १६५ वें पुष्प म्हणून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

भाषान्तरशाखा,
प्राच्यविद्यामंदिर,
बडोदें.
१४–५–४१.

भा. प्र. कोठारी.
भा. मदतनीस.

ज्यो. मा. महेता.
विद्याधिकारी,
राज्य बडोदें.

श्री.

# प्रस्तावना

शिवपूर्वकालीन महाराष्ट्राच्या इतिहासांत मलिक-अंबर याचें नांव प्रामुख्यानें येतें. शेतीच्या जमिनीची मोजणी व वर्गवारी त्यानेंच दक्षिणेंत करून शेतसारा नक्की ठरविला. गनिमी-युद्धाला त्यानेंच सुरुवात केली व उत्तरेकडील मोगल हे परके मुसलमान आहेत ही जाणीव त्यानेंच प्रथम करून दिली. अशा थोर पुरुषाचें चरित्र इ. स. १६०० पासून इ. स. १६२६ पर्यंतच्या काळांतच दिसतें. मृत्युसमयीं हा पुरुष ऐशीं वर्षांचा असावा असा तर्क दिसतो. हें पाहिल्यावर इ. स. १६०० पूर्वींच्या पन्नास-साठ वर्षांतील या पुरुषाच्या हालचाली मिळविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. शेवटीं Indian Historical Quarterly या त्रैमासिकांत (सप्टें-बर इ. स. १९३३ चा अंक) हें चरित्र सर जदुनाथ सरकार यांनीं प्रसिद्ध केल्याचें आढळलें. हें चरित्र 'फातुहाती आदिलशाही' या ग्रंथांतून बाबूजींनीं घेतलें आह. हा ग्रंथ ब्रिटिश म्यूझियममधून बाबूजींनीं मिळविला व त्यांतील उपयुक्त भागाची ते हल्लीं भाषांतरद्वारा प्रसिद्धी करीत आहेत हें त्यांच्या

इतिहासप्रियतेचें व इतिहासप्रसाराचें लक्षण होय व त्याबद्दल त्यांचे आभार मानावें तेवढे थोडेच आहेत.

याशिवाय शिवभारत, जहांगीरचें चरित्र, बुसातीनुस्सलातीन, निजामशाहीवृत्त, शहाजीचें चरित्र इत्यादि अनेक पुस्तकांतून या चरित्रासंबंधीं जें जें मिळालें तें सर्व एकत्र करून यांत कालानुक्रमानें सांगितलें आहे. श्री. चित्रे यांच्या आत्माराम छापखान्यांत मुद्रितें तपासण्याचें काम चांगलेंच होत असल्यानें हें पुस्तक लवकर प्रसिद्ध झालें हें मुद्दाम नमूद करावेसें वाटतें. सर्वच छापखान्यांत असें काम होईल तर मुद्रितें तपासण्याचे पुष्कळच श्रम कमी होतील. असो. मलिक-अंबर ता. १४ मे रोजीं निवर्तला (पृष्ठ ७४) व त्याच तारखेस त्याचें चरित्र सुमारें त्याच्या वयाच्या वर्षाइतक्याच पृष्ठांत प्रसिद्ध होत आहे हा योगायोगच म्हणावयाचा !

असें हें अनेक ठिकाणीं विखुरलेलें चरित्र एकत्र करून तें पुस्तकरूपानें मजकडून लिहून घेतल्याबद्दल मी बडोद्याचे विद्याधिकारीसाहेब यांचा फार आभारी आहें.

तारीख १४-५-१९४१<br>रावपुरा, बडोदें.

वि. स. वाकसकर

[illegible] ग्रंथ [illegible], [illegible]
अनुक्रम .................... वि: [illegible]
[illegible] ...1532... नोंद दि [illegible]

# अनुक्रमणिका.


| प्रकरण. | नांव. | पृष्ठांक. |
|---|---|---|
| १. | पूर्वायुष्य (इ. स. १५४०–१५९५) | १ |
| २. | उदय (इ. स. १५९५–१५९७) | ७ |
| ३. | प्रतिस्पर्ध्यांवर विजय (इ. स. १५९७–१६००) | १३ |
| ४. | गनिमीकाव्याचा विजय (इ. स. १६००–१६१०) | २० |
| ५. | दुहेरी डाव (इ. स. १६०५–१६०९) | ३१ |
| ६. | मोगलांशीं युद्ध (इ. स. १६१०–१६२४) | ३८ |
| ७. | शेवटच्या चळवळी (इ. स. १६२४–१६२६) | ५८ |
| ८. | सिंहावलोकन (इ. स. १५४०–१६२६) | ७७ |

# सनावली

इ. स. १५४० मलिक-अंबर याचा जन्म (कल्पित).

१५९४ बुऱ्हाण निजामशहाचा मृत्यु.

१६०० चांदबीबीचा खून.

१६०४ अकबराचा मुलगा दानियल यास मलिक-अंबर शरण जातो. इब्राहिम आदिलशहाच्या मुलीशीं दानियल याचा विवाह.

१६०५ दानियल व अकबर यांचे मृत्यु. मलिक-अंबर व खानेखानान यांचा तह.

१६०७ निजामशाही राजधानी जुन्नरास नेली. मुर्तुजा निजामशहाशीं मिलाप.

१६१० खडकीची वसाहत व निजामशाही राज्याची तेथें स्थापना.

१६१५ आदिलशहा, कुतुबशहा व मलिक-अंबर यांचा शहाजहानकडून पराजय.

१६१७ निजामशाहीतर्फे मोगलांशीं तह.

१६१९ शहाजहानची मलिक-अंबरावर स्वारी.

१६२० मोगलांविरुद्ध बंड. शहाजीचा प्रवेश.

१६२१ खडकीची लढाई व मलिक-अंबराचा पराजय.

१६२४ भाटवडीचें युद्ध व मलिक-अंबराचा विजय.

१६२६ शहाजहानचें बंड व मलिक-अंबर याचा मृत्यु.

१६५७ शहाजीचें महत्वाचें पत्र (पृष्ठ ५६ वर उल्लिखित).

श्री.

# मलिक-अंबर

## प्रकरण १ लें

## पूर्वायुष्य

इ. स. १५४०—१५९५

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ६९

मुद्दे—१. महत्त्व. २. जन्मवर्ष. ३. जन्मस्थान. ४. गुलाम. ५. पन्नाशीचा वृत्तांत. ६. चांदबीबी. ७. खालसा करणें.

१. **महत्त्वः**—इसवी सनाच्या सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धांत महाराष्ट्रांत अनेक थोर पुरुष होऊन गेले त्यांत मलिक-अंबर याचीहि गणना करितात. त्या काळीं महाराष्ट्रांत 'निजामशाही' नांवाचें एक मुसलमानी राज्य होतें व त्या राज्यांत मलिक-अंबरानें अनेक राजकारणें केल्यामुळें एक प्रख्यात राजकारणी म्हणून मलिक-अंबराला इतिहासकार उत्तम प्रकारें स्तवितात. अलीकडेस मलिक-अंबराचें जीवनवृत्त

प्रकट झाल्यानें त्याच्या वेळच्या राजकारणावर व महाराष्ट्राच्या सांपत्तिक स्थितीवर बराच प्रकाश पडला म्हणून त्याचें चरित्र बाल-वाचकांना निवेदन करण्याचें ठरविलें आहे. कारण तें चरित्र वर सांगितलेल्या अनेक कारणांनीं फार महत्त्वाचें झालें आहे.

२. जन्मवर्ष:—मोगलांच्या पादशाहांमध्यें अकबराची कारकीर्द इतरांपेक्षां अधिक महत्वाची वाटते. हिंदुस्थानदेश हिंदूंचा असल्यानें अकबरानें हिंदूंबद्दल आपलेपणा दाखविला व राजपुतांच्या मुलींशीं विवाहहि केले. आपल्या कारकीर्दीच्या शेवटीं शेवटीं त्यानें आपला मुलगा दानियेल याला मुख्य नेमून त्याच्या हाताखालीं एक मोठी फौज दिली व त्याला दक्षिणेंत पाठविलें (इ. स. १६०४). त्यावेळीं मलिक-अंबरानें मोगलांस शरण जाऊन त्यांची स्वारी परतविली व निजामशाही वांचविली हाच मलिक-अंबराचा उल्लेख इतिहासामध्यें प्रथम येतो. या वेळीं मलिक-अंबरहि चांगला पोक्त, विचारी व अनुभवी असावा असें वाटतें. तारुण्यांतील तडफ यावेळीं त्याच्या वागण्यांत दिसत नाहीं. याप्रमाणें विचार करितां मलिक-अंबराचा जन्म इ. स. १५४० मध्यें झाला असावा असें दिसतें. निदान हेंच त्याचें जन्मवर्ष समजून आपण त्याच्या चरित्राची रूपरेखा आंखूं या.

**३. जन्मस्थान :**—याचा जन्म कोठें झाला हें सांगणें शक्य नाहीं. बगदाद येथें मीर कासिम नांवाच्या एका व्यापाऱ्यानें अंबराला गुलाम म्हणून विकत घेतलें होतें, त्या वेळीं तो लहानच असावा. त्याचा जन्म बगदाद येथेंच झाला असें आपण मानूं व तो थोडासा मोठा म्हणजे सुमारें दहा वर्षांचा होतांच त्याला विकून टाकिला असें कल्पिलें म्हणजे अंबर हा मूळचा गरीब आईबापांचाच मुलगा असावा असें साधारणतः ठरतें. हा हबशी जातीचा असून याचा धर्म मुसलमानी होता यांत संशय नाहीं. मुसलमानांत जातिभेद नाहीं हें खरें, परंतु त्यांच्यामध्यें इतर भेद फार बळकट आहेत. हिंदूंमध्यें ज्याप्रमाणें ब्राह्मण, त्याचप्रमाणें मुसलमानांमध्यें ' सैयद ' हा वर्ण सर्वश्रेष्ठ मानितात. सैयद वाटेल त्याच्या मुलीशीं लग्न करतो पण आपली मुलगी मात्र सैयदासच देतो. कारण सैयद हे महंमद पैगंबराचे वंशज आहेत असें सर्व मानितात. सैयद हा शब्द षाहीद ( = हुतात्मा ) यावरून झाला असावा. शेख, सैयद, मोगल व पठाण हे मुसलमानांतील चार मुख्य समाज प्रसिद्ध आहेत. शेख व सैयद हे अरबस्तानांतील असून मोगल मंगोलियांतील व पठाण अफगाणिस्तानांतील होत. मध्य आशियांतील तुर्कहि मुसलमानच झाले. शिया व सुन्नी हे मुसलमानांतील मुख्य दोन भेद. कोणाशींहि विवाह करण्यास

धर्मानें अडचण नसली तरी मोगल, पठाण, तुर्क हे मुसलमानसुद्धां आपआपल्या समाजांतच विवाह करितात. हें सांगण्याचें कारण इतकेंच कीं, हबशी हा पिढ्यानुपिढया हबशीच राहतो, तो सैयद होत नाहीं. आणि मलिक-अंबर हा मुसलमान होता तरी तो हबशी या जातिनांवानेंच प्रख्यात आहे. हिंदूंमध्यें वर्णांतर होत नाहीं म्हणून त्यांना नांवें ठेविण्याचें कारण नाहीं.

४. **गुलाम** :—आतांपर्यंतच्या वर्णनावरून हें स्पष्ट झालें कीं, इ. स. १५५० मध्यें अंबर दहा वर्षांचा असतांना त्याला मीर कासिमानें गुलाम म्हणून विकत घेतलें. पुढें लवकरच कासीम अहंमदनगरास गेला. अंबरहि त्याच्या बरोबरच होता. पुढें कांहीं दिवसांनीं कासिमनें त्याला चेंघिसखान नांवाच्या निजामशाही सरदाराला विकून टाकिलें. हा सरदार फार मोठा होता. एक हजार गुलाम त्याच्या पदरीं होते, त्यांत अंबराचीहि भरती झाली.

५. **पन्नाशीचा वृत्तांत** :—निजामशाही राज्याची राजधानी अहंमदनगर होय, तेथें राज्य स्थापन झाल्यावर (१४८९) एका मागून एक अनेक निजामशहा झाले. दुसऱ्या निजामशहाच्या मृत्यूनंतर (१५९४) राज्यांत फार अंदाधुंदी माजली व राज्यास उतरती कळाच लागली. ही अवनति यापूर्वींच होऊं

मराठी ग्रंथ संग्रहालय ... वि: २११२ ... १५३८ ... ता. १८

लागल्यानें ती आतां प्रत्ययास येऊं लागली इतकेंच. निजाम-शाहीच्या उतरत्या काळांत मलिक-अंबराला कोठें तरी राहणें भागच होतें व तो इ. स. १५९४ पर्यंत तसा राहिलाहि.

६. **चांदबीबी** :—हें नांव फार प्रसिद्ध आहे. ही एका निजामशहाची मुलगी. आदिलशहाला दिली त्यामुळें ती अहंमदनगराहून विजापुरास आपल्या सासरीं गेली. पुढें दुर्दैवानें हिचा नवरा निवर्तला. नंतर आदिलशाहींतील एक मुलगी निजामशाहींत दिली तेव्हां ही चांदबीबी त्या मुली-बरोबर पाठराखणी म्हणून विजापुराहून अहंमदनगरास म्हणजे आपल्या माहेरींच परत आली; या अहंमदनगरचें मूळ नांव '**बिंकर**' असें होतें व तें लहानसें खेडेंच होतें. पण निजामशाहीची स्थापना करणारा अहंमदशहा यानेंच त्याला मोठ्या नगराचें स्वरूप देऊन तेथें आपली राजधानी स्थापन केली ( १४८९ ). त्यामुळें तेव्हांपासून या बिंकर खेड्यालाच अहंमदनगर हें नांव मिळालें. त्या अहंमदनगरास जाऊन चांदबीबी कायमची राहिली. कारण तेथें निजामशाही राज्याच्या वारसाईसंबंधीं बरेच वारस उपस्थित झाले व त्यांत चांदबीबीनेंहि एकाचा पक्ष घेतला. याच धामधुमींत मलिक-अंबर पुढें सरसावला. मूळचा गुलाम, पण राजकारणांत मुत्सद्दी

म्हणून चांदबीबीच्या नजरेंत तो भरला. मोगलांनीं निजामशाहीवर स्वारी केली व (सन १५९९ मध्यें) चांदबीबीचा खून होऊन मोगलांस विजय मिळाला. पुढें मोगली फौज परत फिरली, परंतु अहंमदनगरास एका बाल-निजामशहाची स्थापना करण्यांत आली. मूर्तुजा निजामशहा तो हाच होय. हा निजामशहा आदिलशहाचा नातू अथवा पणतु होय. याची कारकीर्द यशस्वी करण्यांत ज्याचें नांव प्रामुख्यानें पुढें येतें तोच मलिक-अंबर होय. ही मलिक-अंबराच्या चरित्राची स्थूल रूपरेषा झाली. यांत बरेच बारीकसारीक आणि नाजूकसाजूक व संक्षिप्त—विस्तृत वृत्तांत आहेत ते क्रमाक्रमानें पुढील प्रकरणांत सांगूं.

७. **खालसा करणें:**—मागें परिच्छेद २ मध्यें अकबरानें महाराष्ट्रावर स्वारी केल्याचा उल्लेख आहे. हिंदुस्थानांत पूर्वीं अनेक लहान लहान राज्यें होतीं पण इस्लामी अमलांत तीं नष्ट झालीं. कारण इतरांचीं राज्यें पादाक्रांत करणें, खालसा करणें व आपल्या राज्यास जोडून टाकणें हे प्रकार आर्यांनीं केले नाहींत. मुसलमानी व ख्रिस्ती राष्ट्रेंच या खालसा वृत्तींत तरबेज दिसतात. असो.

# प्रकरण २ रें

## उदय

### इ. स. १५९५–१५९७

मुद्दे—१. जमादारी. २. निजामशाहींतील भानगडी. ३. कर्तृत्वास प्रारंभ. ४. पराक्रम. ५. बेबंदशाही. ६. मलिक-अंबराची शिस्त. ७. मोगलांचा वेढा.

**१. जमादारीः**—इ. स. १५९५ पासून इ. स. १६०० पर्यंत पांच–सहा वर्षांत अकबर बादशहानें महाराष्ट्र पादाक्रांत केला. राज्यें खालसा करण्याचा प्रारंभ अकबरानेंच प्रथम हिंदुस्थानांत सुरू केला हें लक्षांत ठेविलें पाहिजे. खानदेश, वऱ्हाड व दौलताबाद येथील किल्ले मोगलांनीं हस्तगत केल्यावर मलिक-अंबर हा प्रथम दुसऱ्या इब्राहिम आदिलशहाच्या पदरीं ( याची कारकीर्द इ. स. १५८० पासून इ. स. १६२६ पर्यंत होती ) विजापुरास साधारण गुलामांचा अंमलदार अथवा जमादार या हुद्यावर नोकरीस राहिला. यावेळीं

इकडे अहंमदनगरास निजामशाहीमध्यें काय उलाढाली झाल्या तें सांगतों.

२. **निजामशाहींतील घोटाळेः**—सन १५९४ मध्यें बुऱ्हाण निजामशहा मृत्यु पावल्यावर त्याच्या राजधानीमध्यें म्हणजे अहंमदनगरास फार भानगडी उपस्थित झाल्या. बुऱ्हाणचा मुलगा इब्राहिम हा तत्काल गादीवर बसला, परंतु अवघ्या चारच महिन्यांत तो मरण पावला. त्यानंतर कारभाऱ्यानें अहंमद नांवाच्या एका मुलास गादीवर बसविलें, परंतु तो राजघराण्यांतील नसल्याबद्दल वाद उपस्थित झाला. कारभाऱ्यानें मोगलांची मदत मिळवून त्यांच्याकडून अहंमदगरास वेढा घालविला. याच राजकीय अस्वस्थतेंत व मोगलांच्या वेढ्यामुळें झालेल्या लढाईत चांदबीबीनें कुशलता व राजकीय धोरण वापरून प्रसिद्धी मिळविली. यावेळीं निजामशाहीस अनेक वारस उभे राहिले होते व त्या प्रत्येकाला निरनिराळे पुरस्कर्तेहि मिळाले. बुऱ्हाण निजामशहाचा एक नातू बहादुर या नांवाचा होता आणि राज्याचा मालक म्हणून तो पुढें आला असून त्याचा पुरस्कार खुद्द चांदबीबी करीत होती. निजामशाही हें चांदबीबीचें माहेर व आदिलशाही हें सासर असल्यानें या आणीबाणीच्या वेळीं निजामशाहीला आदिलशाहीकडून मदत होऊं लागली. आणि

याच धामधुमींत चांद्बीबीचा खून झाला. परंतु ती ज्याचा पुरस्कार करीत होती तो बहादुर मात्र पुढें सरसावला.

**३. कर्तृत्वास प्रारंभ :**—बहादुर हा पुढें सरसावला होता, परंतु त्याच्या नशिबीं राज्य नव्हतें त्यामुळें तो अकबराच्या कैदेंत पडला व त्याचाच भाऊ बुऱ्हाण हा निजामशाहीवर अधिष्ठित झाला. या निजामशाही राज्याच्या वारसांची आपणांस तूर्त फारशी आवश्यकता नाहीं. परंतु बहादुरशहाला बाजूला सारण्यांत जे पुढारी होते त्यांतच आपला चरित्रनायक मलिक-अंबर हा होता. अर्थात् बुऱ्हाणशहाला राज्य मिळवून देण्यांत पर्यायानें मलिक-अंबर कारण होता हें स्पष्ट होय.

**४. पराक्रम :**—अभंगखान या नांवाचा एक हबशी सरदार हा मागें सांगितलेल्या बहादुरशहाच्या विरुद्ध पक्षांतील मोठा पराक्रमी होता. तो बहादुरशहाच्याच विरुद्ध झाल्यामुळें इतर कांहीं सरदार व त्यांचे जातभाई हबशी हेहि अभंगखानाचे वैरी बनले. परंतु अशा आणीबाणीच्या वेळीं मलिक-अंबर मात्र अभंगखानाच्या पक्षास निश्चयानें चिकटून राहिला व त्यामुळें तो दिडशें स्वारांचा नायक बनला. यावेळीं अहंमदनगरास बहादुर-शहाची सत्ता असल्यानें अभंगखानानें अहंमदनगरावर स्वारी केली, तेव्हां एका चढाईंत मलिक-अंबर हा अभंगखानाच्या

पाठीवर राहून त्यानें मोठें शौर्य गाजविलें. एके दिवशीं तर अहंमदनगरचा किल्ला सर करण्यासहि तो पुढें सरसावला होता.

**५. बेबंदशाही :**—याच सुमारास (सन १५९५) दिल्लीहून अकबरानें आपला मुलगा दानियाल व सरदार खान-खानान यांच्याबरोबर फौज देऊन त्यांना अहंमदनगरावर पाठविलें. त्यांनीं येऊन अहंमदनगरास वेढा दिला. याप्रमाणें मोंगलांचा वेढा पडतांच अहंमदनगर येथील आपसांतील शत्रुत्व लुप्त झालें व दक्षिणेंतील सरदार व फौज तेथून निघून गेली. अहंमदनगरास मोगलांचा वेढा पडल्यामुळें सगळा निजामशाही प्रदेश उघडा पडून जिकडेतिकडे लुटालूट व बेबंदशाही सुरू झाली. बेबंदशाही म्हणजे 'बळी तो कान पिळी' हें ठरलेलेंच आहे. तात्पर्य, सर्वांच्या वर्तनाला आळा घालणारी बलिष्ठ राजसत्ता लुप्त झाली म्हणजे बेबंदशाही माजते व तीच अहंमदनगरास सुरू झाली होती.

**६. मलिक-अंबराची शिस्त :**—अशी बेबंदशाही पाहून मलिक-अंबर यानें पुढाकार घेऊन राजसत्तेच्या अस्तित्वाची जाणीव जनतेस करून दिली. बेबंदशाहीचें निर्मूलन होण्यास हाच उत्तम उपाय होय. मलिक-अंबरानें आपल्या चिमुकल्या फौजेची तुकडी बरोबर घेऊन अहंमदनगरच्या

सरहद्दीवर सावधपणानें टेहेळणी ठेविली व तसें करीत असतांना लुटारूंची व त्याच्या फौजेची गांठ पडली कीं, तो लुटारूंना कडक शिक्षा करूं लागला. हे लुटारू बहुधा बेडर जातीचेच असत. (सर्वसाधारण लोक अशा लोकांना 'बेरड' म्हणतात. तो बेरड शब्दहि 'बेडर' या शब्दापासूनच रूढ झालेला दिसतो. प्राचीनकाळीं ईजिप्तमध्येंहि बेडर या जातीचे लोक असत व ते मोठे लढवय्ये होते असें इतिहासावरून दिसतें. असो. बेडर अथवा बेरड लोकांचा बंदोबस्त मलिक-अंबरानें केला येथपर्यंत इतिहास आपण वर निवेदन केला आहे. त्या पुढील वृत्तांत आतां सांगूं.) लुटालूट करून पोट भरणें हाच धंदा या बेडर जातीच्या लोकांचा असल्यानें त्या धंद्याला काट बसतांच हे लोक मोठ्या अडचणींत सांपडले. पोट भरण्यासाठीं काय उद्योग करावा याचा ते विचार करूं लागले. शेवटीं, त्यांनीं मलिक-अंबराच्या पदरीं फौजेमध्यें चाकरी करण्याचें ठरवून ते त्यास भेटले. मलिक-अंबरालाहि हेंच हवें होतें. त्यानें दोन हजार 'बेडर' लोक आपल्या फौजेंत ठेविले. याप्रमाणें त्याची फौज वाढतांच त्यानें अनेक दंगेखोरांचें पारिपत्य करून निजामशाहीचा धाक बसविला व आपल्या स्वतःचाहि सरंजाम वाढविला. यावेळीं मलिक-अंबर हा आपल्या पदरीं सहा हत्ती ठेविण्याएवढा मोठा (गजांत लक्ष्मीसंपन्न असा) श्रीमंत सरदार झाला होता.

७. **मोगलांचा वेढा** :—या वेळीं (सन १५९५) दिल्ली येथें अकबर हा मोगल बादशहा राज्य करीत होता. हा बादशहा सन १५५६ मध्यें दिल्लीच्या तख्तावर बसला. त्या वेळीं सर्व हिंदुस्थानांत लहान मोठे असे अनेक संस्थानिक होते. अकबरानें सर्व संस्थानें आपल्या ताब्यांत घेतलीं व त्यांपैकीं बहुतेक आपल्या मोगली साम्राज्यास जोडून टाकिलीं. किंबहुना, संस्थानें खालसा करण्याचा प्रघात अकबरानेंच हिंदुस्थानांत सुरू केला. त्यानें आपलें मोगली साम्राज्य पश्चिमेस ईराणपासून पूर्वेस आसाम व ब्रह्मदेशपर्यंत आणि उत्तरेस हिमालयापासून दक्षिणेस महानंदा व गोदावरी या नद्यांमधील प्रदेशापर्यंत वाढविलें. दक्षिणेंतील निजामशाहीसारखीं मुसलमानी राज्यें जिंकून तीं मोगली साम्राज्यांत सामील करावीं हा अकबराचा हेतूच होता. परंतु तो अकबराच्या हयातींत कांहीं सिद्धीस गेला नाहीं. इसवी सन १५९५-९७ च्या सुमारास मोगलांनीं स्वारी केली, तेव्हां निजामशाहीकडून मलिक-अंबर हा हबशी सरदार मोगलांचा प्रतिकार करण्याच्या सिद्धतेंत गुंतला होता येथपर्यंत आपण आलों इतकेंच ध्यानांत ठेवावयाचें आहे.

## प्रकरण ३ रें

# प्रतिस्पर्ध्यांवर विजय

### इ. स. १५९७–१६००

मुद्दे—१. बाल निजामशहा. २. फौजबंदी सरदारांचा डोईजडपणा. दोन सरदारांची भेट. ४. बुद्धिभेद. ५. मलिक-अंबराचें दूरदर्शित्व. ६. राजू व मोगल यांचा तह. ७. उत्कर्ष.

**१. बाल निजामशहा :**—मोगल बादशहा अकबर यानें निजामशाही जिंकण्यासाठीं अहंमदनगरवर स्वारी केली हें मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. अहंमदनगर हीच निजामशाहीची राजधानी होती म्हणून निजामशाही जिंकण्या-साठीं अहंमदनगर शहरावर स्वारी करणें अवश्यच होतें. त्या शहरास मोगली सैन्यानें वेढा घालून बरेच दिवस गेले. तें वेढयाचें काम फारच रेंगाळलें, तेव्हां मोगलांनीं बहादुरशहास ( निजामशहा ) पकडून कैद केलें व आग्रा अथवा ग्वाल्हेर येथील किल्ल्यावर डांबून ठेविण्यासाठीं राजकैदी म्हणून पाठवून

दिलें. याप्रमाणें मुख्य निजामशहाची व्यवस्था लागल्यावर निजामशाही राज्यावर धनी असा कोणीच राहिला नाहीं, असें मानून मोगलांनी निजामशाही सत्ता नष्ट झाल्याचें प्रसिद्ध केलें. परंतु यावर निजामशाही सरदारांनीं विशेषतः मलिक-अंबराच्या पुढारीपणाखालीं एक नवीनच युक्ती लढविली. याच सुमारास बुऱ्हाणनिजामशहाचा मुलगा शहावली हा विजापुरच्या आदिल-शाही राज्यामध्यें कैदेंत होता. तो एके दिवशीं एकदम तेथून नाहींसा झाला. कांहीं महत्त्वाच्या राजकारणासाठींच त्याला आदिलशहानें कैदेंतून मुक्त केलें असावें. कारण हा शहावली विजापुरच्या कैदेतून जो निघाला तो परिंड्यावर जाऊन राहिला. निजामशाही राज्याचा तो खरा वारस असल्याचें पाहून मलिक-अंबरानें त्याला आपलेकडेस बोलाविलें. परंतु शहावलीला अंबराचा विश्वास न वाटल्यानें तो त्याच्याकडे गेला नाहीं. शेवटीं अंबरानें शपथा—आणा वाहून त्या शहावलीला वैभवानें आणून निजामशाही राज्यावर त्याची स्थापना केली. अंबराच्या या राजनिष्ठेमुळें निजामशाहींतील बंडखोर सरदार नरम झाले व तेथील स्थिति एकदम बदलली. याच वेळीं चांदबीबी ही शूर स्त्री प्रसिद्धीस आली.

आदिलशाही हें तिचें सासर व निजामशाही हें तिचें

माहेर होय. त्या माहेराचें संरक्षण करीत असतांना ती सन १६०० मध्यें अहंमदनगरच्या किल्ल्यावरच बळी पडली आणि नंतर तो अहंमदनगरचा किल्ला मोगलांच्या ताब्यांत गेला. यावेळीं दिल्लीस अकबर बादशहा तख्तावर असल्यानें त्यानें तो किल्ला व निजामशाही प्रदेश आपला मुलगा दानियेल याच्या स्वाधीन केला.

**२. फौजबंद सरदारांचा डोईजडपणा**:—अहंमदनगर हें निजामशाही राजधानीचें शहर जरी मोगलांनीं सर करून तेथें आपली सत्ता स्थापन केली तरी अंबरानें निजामशहाच्या वंशांतील एका मुलास आणून त्याला राज्याभिषेक केला व याप्रमाणें सरदारांच्या साह्यानें पुनः निजामशाहीची प्राणप्रतिष्ठा केली हें मागें सांगितलेंच आहे. तो काळ मोठ्या आणीबाणीचाच होता. त्यामुळें सरदार म्हटला कीं, फौजबंद लढवैया सरदारच डोळ्यांपुढें उभा राहतो. त्या काळचे सरदार फौजबंद असल्यानें डोईजडहि असत. ‘ बळी तो कान पिळी ’ हाच नियम सर्वत्र रूढ असल्यानें ते फौजबंद सरदार आपल्या इच्छेप्रमाणें वाटेल तो धुडगूस वाटेल त्यावेळीं घालीत असत. अशा प्रकारचें पण त्या काळचेंच एक उदाहरण आतां सांगावयाचें आहे. निजामशहाचे अनेक देहसंरक्षक ( A. D. C.)

होते व त्या सर्वांचा मुख्य सादतखान या नांवाचा एक सरदार होता. हा सादतखान प्रथम निजामशहाच्या पदरीं गुलाम होता, पण पुढें त्याची योग्यता पाहून त्याला सरदारी दिली व तो देहसंरक्षकांचा मुख्य झाला. मोगलांच्या स्वारीपासून निजाम-शाहीस उतरती कळा लागली. ती पाहून हा सादतखान शहरांतील वसती सोडून रानावनांत व डोंगरकपारींत जाऊन राहिला. अशा प्रकारें राहणें फार धोक्याचें असल्यानें त्या बाजूस सहसा कोणीच जात नाहींत. सादतखानानें अशा ओसाड प्रदेशांत वसाहत करून चांगला तेथेंच सहासात वर्षें मुक्काम केला व कांहीं मजबूत डोंगरी किल्लेहि बळकाविले. मोगलांच्या फौजेला त्यानें पुष्कळच त्रास दिला व हैराणहि केलें. सामन्या-मध्यें मोगली फौजेचा पराजय झाला तर हा यथेच्छ लूट करीत असे. यामुळें याच्या पदरीं हत्ती, घोडे व द्रव्यसंचयहि चांगलाच झाला होता.

**३. दोन सरदारांची भेट** :—याप्रमाणें डोंगरकपारींत सादतखान व मैदानावर मलिक-अंबर यांनीं मोगली फौजेस हैराण करून सोडिलें. या धुमश्चक्रींत मोगलांचा मुख्य सरदार खानखानान हा अगदीं बेजार झाला होता. त्यास एकदां समक्षच भेटावें असें सादतखानानें ठरविलें. सादतखानाच्या

पदरीं राजू या नांवाचा एक चांगला इसम होता. मोगलांवर डोंगरकपारींतून वारंवार हल्ले चढविण्यांत राजूच पुढाकार घेई. त्यामुळें मोगली सैन्याला त्याच्या नांवाची दहशत बसली होती, म्हणून सादतखानानें आपला सर्व कारभार व आपल्या ताब्यांतील किल्ले वगैरे सर्व कांहीं राजूस सोंपिले व आपण स्वतः खानखानानच्या भेटीस गेला. मागें दुसऱ्या प्रकरणांत सांगितलेल्या अभंगखानानें ही संधि साधली. मलिक-अंबर हा याच्याच पक्षास मिळाला होता. सादतखान हा मोगलांच्या खानखानानास भेटला तेव्हां इकडे अभंगखान राजूच्या मुलाखतींत गर्क झाला होता.

४. **बुद्धिभेद**:—अभंगखान हा राजूला भेटून म्हणाला, "तुझा धनी सादतखान हा मूळचा निजामशहाचा नोकर असून आतां मोगलांस मिळण्याच्या विचारांत आहे. त्यानें निजामशाहीच्या नांवावर मिळविलेलें द्रव्य, किल्ले व फौज आतां यापुढें मोगलांच्या आज्ञेनें निजामशाहीवरच उलटणार. अशा वेळीं तूं निजामशाहीच्या अन्नाला स्मरून तुझे किल्ले व फौज निजामशाहीच्याच उपयोगास लाविलीस व सादतखानास इकडेस येऊं दिलें नाहींस तर तुझी कीर्ति अमर होईल." अभंगखानाचे हे विचार राजूस पटले व त्यानें एक हजार सैन्य

जमविलें. याप्रमाणें सिद्धता झाल्यावर एका बाजूनें राजू व दुसऱ्या बाजूनें अंबर यांनीं मोगलांचा प्रदेश अगदीं वैराण करून टाकिला. मोगलांवर एकदम छापे घालून त्यांची मनसोक्त कत्तल हे दोघे करीत असत. यामुळें यांच्याजवळ चांगलाच द्रव्यसंग्रह होऊन यांच्या पदरीं मनुष्यबळहि वाढलें. याप्रमाणें सात-आठ वर्षें झाल्यावर मोगलांनीं मलिक-अंबराशीं तह केला.

५. **अंबराचें दूरदर्शित्व**:—या वेळेस, म्हणजे मोगलांनीं तह केला त्या सुमारास, अंबराचें सैन्य नऊ हजारपर्यंत वाढलें होतें. तह झाल्यावर अंबरनें खानखानानमार्फत अकबराचीहि मुलाखत घेऊन मोगलांची सरदारी मिळविली व त्यासाठीं तो दिल्लीस गेला होता असें म्हणतात. तिकडून परत आल्यावर त्यानें आपल्या मुलुखांत व्यवस्थित लावणी वगैरे करविली.

६. **राजू व मोगल यांचा तह**:—अंबराशीं मोगलांचा तह झाला परंतु राजू तसाच राहिला. त्यानें मोगली मुलुख लुटण्याचा क्रम जोरानें चालविला होता. तो गमिनी काव्यानें लढून मोगलांस अगदीं अनावर झाला होता. शेवटीं मोगलांनीं त्याच्याशीं तह केला व मोगली मुलुखांतील जमीनमहेसुलाच्या उत्पन्नाचा अर्धा भाग त्यास देण्याचें मान्य केलें. हा तह दानि-

यल यानें मोगलांतर्फे केला. या तहामुळें राजू व मोगल या दोघांचे दोन अंमलदार प्रत्येक गांवांत राहूं लागले.

**७. मलिक-अंबराचा उत्कर्ष :**—परंतु या तहांत पटण× हा कसबा कांहीं समाविष्ट झाला नव्हता. तो कसबा फारच श्रीमंत व व्यापारी लोकांनीं अगदीं गजबजलेला होता. राजूनें त्या कसब्याची द्रव्यसंपन्नता पाहून तीस हजार होनांची मागणी तिकडेस पाठविली. परंतु पटणच्या लोकांनीं ती धुडकावून लाविली. तें पाहून राजूनें तत्काळ त्यावर स्वारी करून चार लक्ष होनांची खंडणी वसूल केली. याप्रमाणें राजू मोठा पराक्रमी व धाडसी असल्यानें त्याचा धाक सर्वांस वाटूं लागला. परंतु राजूची नीतिमत्ता फारच हलकी होती. किंबहुना पदरच्या लोकांच्या बायकांवर त्याची पापी नजर असल्यानें ते लोक त्यास सोडून जाऊं लागले. मलिक-अंबरानें ही संधि साधून त्याच्या निघून गेलेल्या नोकरांस मोठ्या सन्मानानें आपल्या पदरीं ठेविलें व आपला लौकिक वाढविला.

---

× हें पटण जबलपुराजवळील असावें.

# प्रकरण ४ थें

## गनिमीकाव्याचा विजय

इ. स. १६०० ते इ. स. १६१०

मुद्दे—१. मलिक-अंबराची राजनिष्ठा. २. राजूचा बंदीवास. ३. चांदबीबीची थोरवी. ४. मलिक-अंबराची चलती. ५. गनिमी-काव्याचें जनकत्व. ६. गनिमी-कावा व मराठी साम्राज्य. ७. राजपुत्र पर्विज् याचें आगमन.

**१. मलिक-अंबराची राजनिष्ठा :**—राजूच्या अनीतिकारक वर्तनामुळें राजूच्या पदरचे लोक राजूची चाकरी सोडून जाऊं लागले हें पाहतांच मलिक-अंबरानें त्यांना आपल्या पदरीं ठेवून घेतलें हें मागें सांगितलेंच आहे. मलिक-अंबर हा फार चाणाक्ष कार्यकर्ता असल्यानें शत्रुपक्षाचा पाडाव करण्याचा एकहि क्षण तो वायां जाऊं देत नसे. त्याचें व राजूचें वैर झाल्यावर राजूवर मात करणें हें त्याचें कर्तव्यच ठरलें. राजूच्या पदरचे लोक राजूची बाजू सोडून जात असल्याचें कळतांच

क्र. ६१५८



राजूचा पक्ष निर्बळ होण्यास प्रारंभ झाल्याचें त्याच्या ध्यानांत आलें व तो असली संधि घालविणारा मुळींच नसल्यानें त्यानें त्या लोकांस आपल्या पदरीं ठेवून घेतलें व लागलीच राजूवर स्वारी केली. यापूर्वी राजूनें सादतखानाचा जो खजीना बळकाविला होता तो खजीना व किल्ला ही सर्व स्थावर-जंगम संपत्ति राजूपासून सर करून मलिक-अंबरानें आपल्या ताब्यांत घेतली. या सुमारास मोगली फौजेनें जी गडबड केली त्यामुळें निजामशहाच्या कुलांतील एका बालकास कसें गादीवर बसविलें वगैरे मोठी रोमांचकारी कथा मागें तिसऱ्या प्रकरणांत आरंभींच सांगितली आहे. आपल्याला आतां राजूच्या हालचालीचा विचार करावयाचा आहे.

२. **राजूचा बंदिवास :**—राजूनेंहि मलिक-अंबराची दूरदृष्टि व राजनिष्ठा पाहून त्याचीच कृपा संपादन करण्यासाठीं तीन हत्ती, नऊ घोडे, कांहीं मूल्यवान वस्तू व चाळीस हजार होन नजराणा म्हणून मलिक-अंबराकडे पाठविले. याप्रमाणें राजू अनुकूल होतांच त्यास खवासखान्यांत ( हत्तीवरील अंबारींत स्वारीच्या मागील जागेंत ) बसण्याचा बहुमान देण्यांत आला. परंतु राजूचा विश्वासघातकी स्वभाव मलिक-अंबरास पूर्णपणें ठाऊक असल्यानें तो राजधानीहून परत आपल्या गांवीं

जातांच राजूच्या पदरच्या माणसास मलिक-अंबरानें आपल्याकडे वळवून घेतलें. कोणासहि आपल्या पक्षास वळवून घेण्यास गोड बोलणें, द्रव्य देणें, धाक दाखविणें व मन कलुषित करणें यांपैकीं कोणता तरी एक उपाय अवश्य असतो. या नियमाप्रमाणें मलिक-अंबरानें वागून राजूचीं माणसें आपल्याकडेस वळवून घेतलीं. हा प्रकार पाहून राजू फार घाबरला व त्यानें स्वसंरक्षणासाठीं निजामशहाकडून वचन मिळविलें व मग तो राजधानीस गेला. परंतु तो राजधानींत शिरतांच मलिक-अंबरानें त्याला पकडलें व त्याच्या सर्व मिळकतीची जप्ती केली आणि ती सगळी संपत्ति सरकारजमा केली.

**३. चांदबीबीची थोरवी:**—याच समयाला चांदबीबी हें स्त्रीरत्न प्रसिद्धीला आलें. दक्षिणेंत चांदबीबी व उत्तरेंत नूरजहान या दोन राजस्त्रिया शंभर वर्षांच्या कालावधींतील होत. चांदबीबीनंतर तीस-चाळीस वर्षांनीं नूरजहान चमकली. जहांगीर, शहाजहान व नूरजहान या तीनहि शब्दांत जहान म्हणजे पृथ्वी हा शब्द आहे व तो उगीच स्तुतिपर आणि अतिशयोक्त आहे. नूरजहानचें सगळ राजकारण स्वार्थासाठीं होतें व चांदबीबी आपल्या माहेरकरांसाठीं बळी पडली. मुसलमानी रियासत, भाग १, पृष्ठ २५१ वर चांदबीबीसंबंधीं पुढील गौरवपर विवेचन आहे:—

" दक्षिण हिंदुस्थानांत जीं पराक्रमी माणसें निपजलीं, त्यांत चांदबीबीची गणना मुख्यत्वानें आहे. तिच्यासारखीं स्त्री-रत्नें तर फारच थोडीं सांपडतील. ती स्वरूपानें सुंदर असून अल्पवयांत भर्तृवियोग झाला असतां तिनें आपलें वर्तन अखेरपर्यंत निर्मळ ठेविलें. विजापुर व अहंमदनगर येथील घडामोडींत स्वकर्तव्य बजाविण्यांत तिनें कसूर केली नाहीं. तिच्या अप्रतिम शौर्याची पारख अनेक प्रसंगीं झाली. तिचा शेवट दुःखमय झाला. ( कारण राजकारणांत तिचा खून झाला. ) हें ऐकून सर्व लोक हळहळतात आणि आजतागाईत संमानपुरःसर तिचें स्मरण करितात."

४. **मलिक-अंबराची चलती:**—अहंमदनगर जिंकून मोगलांनीं आपली सत्ता तेथें स्थापन केली परंतु तेथील प्रजेला मोगलांबद्दल मुळींच आपलेपणा वाटत नसे. हें पाहून मलिक-अंबर यानें निजामशाही सत्ता स्थापून तिचा विस्तार करण्यास सुरवात केली. त्यानें आदिलशाही व कुतुबशाही राज्यांच्या सर-हद्दीपर्यंत तसेंच अहंमदनगरपासून ८ मैल अलीकडे आणि उत्तरेस चेऊल बंदरापर्यंत नि दक्षिणेस दौलताबादेपर्यंत सर्व प्रांत आपल्या म्हणजे निजामशाही सत्तेखालीं आणिला. मलिक-अंबरा-प्रमाणेंच दुसरा एक सरदार मीया राजू हाहि निजामशाहींत मोठा

प्रबळ असून त्यानें दौलताबादचा किल्ला व गुजरातच्या दक्षिणेकडील निजामशाही प्रांत आपल्या ताब्यांत घेतला. याप्रमाणें दोन सरदार प्रबळ झाल्यानें मोगलांची सत्ता अगदीं डळमळीत झाली. इतक्यांत मोगल बादशहा अकबर हा मरण पावला, व त्याचा पुत्र जहांगीर हा दिल्लीच्या तख्तावर विराजमान झाला (संन १६०५). त्यानें खानखानान, खानजहान वगैरे मोगलांचे सरदार दक्षिणेंत पाठवून मलिक-अंबराशीं लढाया सुरू केल्या. याच सुमारास मलिक-अंबर व मीया राजू यांच्यामध्यें स्पर्धा उत्पन्न झाली होती. या आपसांतील स्पर्धेचा परिणाम बरा नाहीं असें पाहून मलिक-अंबरानें मीया राजूस युक्तीनें कैद केलें व सर्व राज्यकारभार स्वतःच पाहण्यास सुरवात केली. हा सर्व प्रकार सन १६०७ मध्यें झाला, आणि लागलीच त्यानें निजामशाही राजधानी खडकी येथें स्थापन केली. याप्रमाणें खडकी हें राजधानीचें शहर झाल्यावर पुढें काय काय प्रकार झाले तें ओघानें कथन करूं.

५. **गनीमीकाव्याचें जनकत्व :**—निजामशाही राज्यकारभार व शत्रूंशीं युद्ध करण्याची पद्धति यांकडे मलिक-अंबर हा विशेष दक्षतेनें पाहत असे. मोगली सत्तेची वाढ होऊं देऊं नये असा त्याचा हेतु होता. समोरासमोर उभे राहून

युद्ध करण्याच्या चालींत अथवा रीतींत मलिक-अंबरानें फेरफार अथवा बदल केला. आजुबाजूच्या खिंड्यांत लपून तेथून शत्रूवर हल्ले चढविणें ही गनिमीकाव्याची युद्धपद्धति मलिक-अंबर यानेंच प्रथम व्यवस्थित व राजरोसपणें सुरू केली नि ती मोठी यशस्वी झाली. या गनिमी पद्धतीच्या युद्धानेंच मोगलांचें साम्राज्य पुढें शंभर वर्षांनीं अगदीं लयास गेलें. मराठा शिलेदाराची चपळता अंबराच्याच मनांत प्रथम फार भरली व या चपळतेच्या जोरावरच त्यानें गानिमी युद्धपद्धति सर्वत्र सर्रास सुरू केली. गनिमी युद्धाची रीत म्हणजे, एका जागेवर डांबून, उभे राहून कधींहि न लढणें, शत्रुसैन्याच्या आसपास घिरट्या घालीत फिरणें, त्याचा दाणा, वैरण आणि इतर पुरवठा लुटणें अथवा अडविणें, भोंवतालचा प्रदेश लुटून अगदीं उजाड करणें आणि घाटांत अथवा खिंडींत शत्रु-सैन्यास बेजार करणें. अशा या गनिमी पद्धतीमुळें मोगल सैन्य अगदीं मेटाकुटीस आलें. स्पॅनियर्ड लोकांनीं नेपोलियनच्या फौजेचाहि याच पद्धतीनें धुव्वा उडविला व हायलंडर लोक मुख्य जमीनदारांना या गनिमीकाव्यानेंच बेजार करून वठणीवर आणितात. मलिक-अंबर हा या गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीचा प्रणेता नसला तरी प्रसारक असून उत्कृष्ट नेताहि होता. हीच पद्धति पुढें छत्रपति शिवाजीनें पूर्णत्वास नेऊन यश मिळविलें हें पाहिलें म्हणजे मराठ्यांच्या मनांत राष्ट्रीयत्व उत्पन्न करण्यास ही

गनिमी काव्याची युद्धपद्धतीच फार उपयोगी पडली असें म्हणावें लागतें. निजामशाहीची सेवा एकनिष्ठेनें करावी व मोगलांचा शिरकाव होऊं देऊं नये एवढाच मलिक-अंबराचा हेतु होता. पुढें तो हेतु साध्य करून मराठ्यांनीं त्या कलेच्या जोरावर स्वराज्य स्थापन केलें हा मराठ्यांच्या नेत्यांचा प्रताप मोठा आश्चर्यजनक होय.

६. **गनिमीकावा व मराठी साम्राज्य** :—गनिमी कावा व मराठ्यांचा पराक्रम यासंबंधीं न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांनीं आपल्या 'मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष' (Rise of the Maratha Power) या पुस्तकाच्या नवव्या प्रकरणांत (जिंजी Gingi) शेवटीं शेवटीं फार मार्मिक विचार प्रकट केले आहेत. मलिक-अंबरच्या चरित्राशीं त्याचा प्रत्यक्ष संबंध नाहीं तरी मलिक-अंबरानें अस्तित्वांत आणिलेल्या गनिमी युद्धपद्धतीचा काय परिणाम झाला हें स्पष्ट दिसत असल्यानें तेवढा महत्त्वाचा मजकूर याखालीं देतों. मूळ पुस्तक इंग्रजीमध्यें असून त्याचें भाषांतर 'ग्रंथमाला' मासिकांत प्रकरणशः प्रसिद्ध झालें हें सर्वश्रुत आहेच.

"येणेंप्रमाणें (सन १६८७ ते सन १७०८) वीस वर्षेंपर्यंत चाललेल्या 'स्वातंत्र्ययुद्धाचा' शेवट गोड झाला.

या युद्धापासून जीं फळें मिळालीं त्यांवरून पाहिलें तर असें दिसतें कीं, हीं वीस वर्षें म्हणजे मराठ्यांच्या इतिहासांतील अतिशय कीर्तिकर काळ होय. शिवाजीची गोष्ट निराळी. वास्तविक मोगलांच्या एकंदर सैन्याशीं शिवाजीस कधींहि युद्ध करावें लागलें नाहीं. वास्तविक मोगलांचा सरदार जयसिंग यानें जेव्हां त्यास अगदीं पेंचांत आणिलें तेव्हां स्वार्थत्याग करून शिवाजी खरोखर त्यांना (मोगलांना) शरण गेला. शिवाय दक्षिणेंतील (आदिलशाही व कुतुबशाही या) दोन राज्यांचा त्याला चांगला पाठिंबा असून मोगलांना त्रास देण्यास त्यांचा त्याला उपयोग होई. इतकें असून लढाई करावयाची तीहि डोंगरी किल्ल्यांचा आश्रय धरून करावयाची. या सर्व गोष्टींत वरील स्वातंत्र्याचें युद्ध करून ज्या स्वदेशभक्तांनीं जय मिळविला, त्यांना कोणत्याही प्रकारें अनुकूल स्थिति नव्हती. शिवाजीचा स्वभाव व त्याचे पराक्रम यांच्यामध्यें कांहीं दैवी शक्ति असून, त्याच्या देशबांधवांपैकीं एकाच्या हातूनहि त्यास प्रतिबंध करितां आला नाहीं. असा एकादा पुढारीसुद्धां वरील स्वदेशभक्तांना मिळाला नाहीं. मोगलांच्या एकंदर सैन्याशीं त्यांना झुंजावें लागलें. त्या प्रबळ सैन्याचें आधिपत्य खुद्द औरंगजेब बादशहाकडे. हिंदुस्थानांतील संपत्तीचीं साधनेंहि त्याच्याच ताब्यांत. संभाजीच्या अतिक्रूर व गैरशिस्त वर्तनामुळें

त्यांच्यांतील अतिशय अनुभविक पुढारी मारले जाऊन त्यांच्या अव्यवस्थेमुळें किल्ल्यांची सुद्धां चांगली तयारी नव्हती. त्यांचा राजा मोगलांच्या अटकेंत असून, स्वदेशांतून हाकलल्यामुळें परदेशांत जाऊन त्यांना आश्रय शोधावा लागला. वसूल नाहीं, सैन्य नाहीं, किल्ले नाहींत व द्रव्य मिळविण्याचें कोणतेंहि साधन नाहीं; अशी स्थिति असतांनाहि त्यांनीं नवें लष्कर जमा केलें, शत्रूपासून किल्ले परत घेतले व **मुलूख जिंकण्याची एक नवीनच पद्धति काढली.** तिच्या योगानें त्यांना स्वराज्य मिळालें. एवढेंच नव्हे तर महाराष्ट्र व कर्नाटक या प्रदेशांत चौथाई व सरदेशमुखी हेहि हक्क मिळाले. ही लढाई करण्याची नवीन टूम काढून ती अमलांत आणणाऱ्या लोकांपैकीं राजाराम, प्रल्हाद निराजी, संताजी घोरपडे इत्यादि पुष्कळ लोक हा झगडा चालू असतांच मृत्यु पावले, पण त्यांची जागा ज्यांनीं घेतली त्यांनींहि कळकळीनें काम करून यश संपादन केलें. औरंगजेबानें महाराष्ट्रावर स्वारी करून ही लढाई जशी जोरानें चालविली तशी चालविली नसती तर तंजावर येथील छोटेखानी संस्थानासारखेंच एक संस्थान पश्चिम महाराष्ट्रांतही स्थापलें गेलें असतें व त्या संस्थानचा राजा म्हणजे आपल्या पदरच्या बड्या सरदारांपैकीं एक सरदार आहे असें मानण्यास त्यास फावलें असतें. शिवाजीनें उत्पन्न केलेला हुरूप पुढच्याच

पिढीला नष्टप्राय होऊन गेला असता. एकोप्यानें न राहतां फूट करून राहण्याची जी प्रवृत्ति नेहमीं जोरांत आहे, तीच चालू राहून मराठी राष्ट्राची रचना अशक्य झाली असती.

"हीं सर्व संकटें टळलीं व लोकांना जें नवीनच वळण लागलें त्याचें श्रेय औरंगजेबाच्या महत्त्वाकांक्षेसच दिलें पाहिजे. औरंगजेबानें महाराष्ट्रांतील लोकांचें अंतःकरणरूप पाणी अगदीं खोलपर्यंत ढवळून त्यास चेतना आणली व वीस वर्षें चाललेल्या लढाईपासून त्यांना जें तीव्र शिक्षण मिळालें, त्यायोगें त्यांच्या पुढाऱ्यांच्या राष्ट्रीय व स्वदेशनिष्ठ उपजतबुद्धि एकवट होऊन पुढच्या तीन पिढ्यांत त्यांना हिंदुस्थानच्या दूरदूरच्या भागाचें स्वामित्वहि प्राप्त झालें. या बाबतींत वरील स्वातंत्र्याच्या युद्धापासून पुष्कळ फायदा झाला. तसा फायदा शिवाजीनें सुरू करून आपल्या विविधरूप कारकिर्दीभर चालविलेल्या लढाई-पासूनहि झाला नाहीं. असल्या भयंकर शत्रूशीं चाललेल्या या महायुद्धांत केवळ पुंड व लुटारू लोकांस यशःप्राप्ति होती ना. धडाडीचें शौर्य, उदात्त सहनशीलता, राजकार्यकौशल्य, प्रत्येक निराशेबरोबर जास्त जास्त वाढणारी उमेद, कधींहि न ढळणारा विश्वास, व्यक्ती, स्थळ, काल इत्यादिकांवर अवलंबून नसणारी आपल्या परम साध्याचे ठायीं भक्ति, समान संकटाच्या वेळची बंधुता, सर्वांच्या कल्याणाकरितां झीज सोसणं व स्वार्थत्याग करणें

याची चाड, आपण धरिलेला पक्ष हा आपल्या धर्माचा पक्ष म्हणून अखेरीस जय मिळालाच पाहिजे अशी श्रद्धा इत्यादि देशांतल्या थोर थोर मनुष्यांच्या अंगांतील सद्गुण ज्या शक्तीच्या योगें प्रसिद्धीस आले ती शक्ति फार उदात्त व सात्विक असली पाहिजे. या पिढींतील स्वदेशभक्त लोक आपल्यावर आलेल्या संकटापासून देशाची सुटका करण्यास याच सद्गुणानें समर्थ झाले. हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याहि ज्ञातींतील लोक या आलेल्या संकटाचा नुसता प्रतिबंध करण्यास सुद्धां समर्थ झाले नाहींत, मग सुटकेची गोष्ट लांबच. हे सद्गुण शिकविण्याची पाठशाळा व तीव्र परंतु पथ्यकर शासनपद्धति या दृष्टीनें पाहिलें तर हा स्वातंत्र्य-युद्धाचा काल मराठ्यांच्या इतिहासांत अत्यंत घडामोडीचा होउन गेला असेंच नेहमीं मानल जाईल."

**७. राजपुत्र पर्विज आला:**—मोगल सरदारांत परस्परांबद्दल असूया असल्यानें मलिक-अंबर यानें भराभर निजामशाही प्रांत परत मिळविले. सन १६०८ मध्यें जहांगीर बादशहानें खानखानान या सरदारास बारा हजार फौजेसह दक्षिणेंत मलिक-अंबरवर पाठविलें. पण मोगलांच्या सरदारांतील वैर पाहून खानखानानहि अगदीं हताश झाला. त्यामुळें सन १६१० मध्यें राजपुत्र पर्विज यास जहांगीर बादशाहानें पाठविलें. परंतु त्यापूर्वींहि कांहीं झटापटी झाल्या, त्या पुढील प्रकरणांत निवेदन करूं.

# प्रकरण ५ वें

## दुहेरी डाव

इ. स. १६०५–१६०९

मुद्दे—१. शिया व सुन्नींचा झगडा. २. अंबराची विनंति.
३. मोगलांची स्वारी. ४. अंबराचा विजय.
५. राजकारण. ६. वैवाहिक संबंध.

**१. शिया व सुन्नींचा झगडा:—** धार्मिक मतभेद फार तीव्र असतात आणि धूर्त व राजकारणी मुत्सद्दी त्यांचा उपयोग करून इच्छित हेतु सिद्धीस नेतात. अशाच आधारावर मलिक-अंबरानें आपलें राजकारण आतां खेळविण्यास प्रारंभ केला. दक्षिणेकडील मुसलमानी राज्यें शियापंथांचीं असून उत्तरेकडील मोगल सुन्नीपंथाचे होते. महंमद पैगंबर हा धर्मोपदेशक (खलीफ) असून राज्यकर्ता (सुलतान) हि होता. परंतु त्याच्या पश्चात् राज्यावर कोणी बसावें यासंबंधीं मतभेद होऊन बलिष्ट लोकांनीं एक सुलतान नेमिला. ते

बलिष्ठ लोक आणि त्यांचे अनुयायी सुन्नी या नांवानें प्रसिद्ध आहेत. पैगंबराचे वंशज राज्यावांचून राहिले पण धर्मोपदेशाचें काम त्यांनीं केलें. कांहीं लोक या वंशजांनाच सुलतान व धर्मोपदेशक म्हणून मानितात, ते लोक शिया या पदवीनें प्रसिद्ध आहेत. या प्रमाणें शिया व सुन्नी हे दोन पंथ असून ते एकमेकांचे वैरीच आहेत. अवघ्या तेराशें वर्षांतील इस्लाम धर्मांत आज पंथ व शाखा पांच-पन्नास आहेत. अशा शाखा उत्पन्न होणें हें त्या धर्माच्या जिवंतपणाचें लक्षण होय. एकादा धर्म जितका प्राचीन व विद्वान् व्यक्तींचा आश्रयदाता तितके त्यांत अधिक पंथ व मतें असतात, असा विचार केला म्हणजे सनातन आर्यधर्माचें महत्त्व प्रत्ययास येईल. असो. मलिक-अंबरानें शिया-सुन्नींच्या या धार्मिक मतभेदाचा फायदा घेण्याचें ठरवून दक्षिणेंतील आदिलशाही व निजामशाही हीं दोनहि शियापंथाचीं राज्यें सुन्नी जे मोगल त्यांच्या विरुद्ध लढण्यास सिद्ध व्हावींत अशा उद्देशानें अंबरानें आदिलशहाची मर्जी संपादून पुष्कळ इनामेंहि मिळविलीं आणि शेवटीं दोनहि राज्यें मोगलांना सामना देण्यास सिद्ध झालीं.

२. **अंबराची विनंति** :—पूर्वी कंदाहार हा किल्ला निजामशहाकडेस होता. नंतर म्हणजे अलीकडेस तो

[library stamp, handwritten accession number]


आदिलशाहाकडे गेला. मलिक-अंबरानें त्यासंबंधीं असें बोलणें लाविलें कीं, 'तो किल्ला आपणास—म्हणजे मलिक-अंबरास—मिळाल्यास तेथें आपलें कुटुंब-बायका-मुलें ठेवून नंतर जोरानें मोगलांशीं आपण झगडा करून त्यांस महाराष्ट्रांतून घालवून देऊं'. याप्रमाणें बोलणें करून तो किल्ला मिळण्याबद्दल अंबरनें शक्य तेवढे प्रयत्नहि केले. एकादा किल्ला दिल्यानें आपलें राज्य स्थिर राहत असेल तर तो किल्ला द्यावा अशीच आदिलशाहाची इच्छा असणें साहजिक असल्यानें त्यानें कंदाहार किल्ला मलिक-अंबरास त्याच्या मागणीप्रमाणें दिला. याप्रमाणें कंदाहार हा किल्ला मिळाल्यावर अंबराचें महत्त्व वाढलें, त्याचा उत्साह वृद्धिंगत झाला, त्याची महत्त्वाकांक्षा भरारली आणि त्याच्या सैन्यांत भरती होऊन त्याची फौजहि संख्येनें अधिक झाली.

**३. मोगलांची स्वारी :**—अकबर बादशहा सन १६०५ मध्यें मृत्यु पावला व लगेच त्याचा मुलगा जहांगीर हा दिल्लीच्या तख्तावर विराजमान झाला. तो बादशहा होतांच त्यानें खानेखानान या आपल्या पराक्रमी सरदाराला दक्षिणेकडील मोहिमांचें काम सोपिल्यानें तो सरदार वारंवार दक्षिणेवर स्वाऱ्या करूं लागला. मोगल सैन्य बालाघाटकडून येऊन दौलताबाद

व त्याच्या जवळपासच्या प्रदेशाला फार त्रास देऊन लुटालूट करून तो प्रदेश उजाड करी. दुसऱ्या बाजूनें वऱ्हाड व खानदेश या प्रदेशांवर मराठे स्वाऱ्या करून त्या प्रदेशाची फार नासाडी करीत. सारांश, मोगल व मराठे हे याप्रमाणें वारंवार स्वाऱ्या करूं लागल्यामुळें त्या प्रदेशांतील प्रजा व विशेषत: शेतकरीवर्ग अगदीं गांजून जाऊन मेटाकुटीस आला. स्वारी करणाऱ्या पक्षाचें ध्येय हेंच असतें कीं, ज्या प्रदेशावर स्वारी करावयाची तो प्रदेश अगदीं ओसाड करून टाकावयाचा. याचें कारण असें आहे कीं, तो प्रदेश तसाच समृद्ध ठेविल्यास तेथील प्रजा अथवा सत्ताधारी वर्ग ताजातवाना राहून युद्ध करण्यास सिद्ध होईल; अथवा इतर शत्रु लुटीच्या आशेनें त्या प्रदेशावर चालून येईल. या दोन्ही प्रकारांना आळा घालण्यास उत्तम उपाय म्हणजे ज्यावर स्वारी करावयाची तो प्रदेश अगदीं ओसाड करून टाकावयाचा हाच होय. असो. दौलताबाद, वऱ्हाड, खानदेश हे प्रदेश मोगल व मराठे यांच्या अनेक व वारंवार होत असलेल्या स्वाऱ्यांमुळें अगदीं जेरीस आले हें पाहून मलिक-अंबरानें आपण मोगलांचा सरदार खानेखानान याचे मित्र असून विजापुरच्या आदिलशहाचे नोकर असल्याचें बेमालुम ढोंग केलें. कारण असें सोंग केल्याशिवाय

त्या वेळीं अन्य मार्गच नव्हता. निजामशाहीमध्यें त्याचें ऐश्वर्य व त्याची सत्ता दिवसेंदिवस इतकी वाढत चालली कीं, इतर पिढीजात सरदार त्याचा द्वेषच करूं लागले. आणि मनुष्य-स्वभाव असाच हेवा करणारा असतो. कृतीकडे लक्ष न देतां वंशपरंपरा मोठेपण मिरविणें यांतच कर्तव्यसमाप्ति मानणारेच बहुतेक असतात !

**४. अंबराचा विजय :**—दक्षिण व उत्तर हिंदुस्थान येथील सत्ताधीश म्हणजे निजामशाही अथवा मलिक-अंबर आणि मोगल यांचा सामना कशा चुरशीनें चालला होता व मलिक-अंबराला काय अडचणी होत्या हें मागें सांगितलेंच आहे. सन १६०५ मध्यें जहांगिरानें खानेखानान हा आपला सरदार निजामशाहीवर म्हणजे मलिक-अंबरावर पाठविला. त्यानें वऱ्हाड व खानदेश हे प्रांत जिंकून आपला मुलगा मिरज याच्या स्वाधीन केले व तो स्वतः स्वस्थ विश्रांति घेत बसला. दक्षिण जिंकण्याचें काम त्याच्या हातून होत नाहीं असें पाहून जहांगिरानें त्याला सन १६०८ मध्यें परत दिल्लीस बोलाविलें. हें पाहून मलिक-अंबरानें त्या संधींत एकदम मोठ्या जोरानें अंतूर किल्ल्यावर स्वारी केली, तो सर केला व त्या किल्ल्यावरील मोगलांच्या सर्व लोकांची त्यानें कत्तल केली. मलिक-अंबराच्या

फौजेस याप्रमाणें यश मिळाल्यानें तिला अधिक धैर्य व उत्साहहि आला आणि एव्हांपासूनच मलिक-अंबराच्या सैन्यास मोगलांच्या फौजांशीं सामना देण्यास मुळींच भीति वाटेनाशी झाली.

**५. राजकारणः**—आदिलशहाचें स्वामित्व पतकरून मोगलांचा पूर्णपणें पराभव करावा असा एक विचार त्याच्या धूर्त व चाणाक्ष बुद्धींत वावरूं लागला. कारण तसें केल्यानें निजामशहा व आदिलशहा अशा दोनहि राजांच्या फौजा आपल्या नेतृत्वाखालीं येऊन त्या संयुक्त सैन्याच्या जोरावर मोगलांच्या अवाढव्य फौजेवर आपणांस यश मिळवितां येईल असें मलिक-अंबराच्या दूरदृष्टीस दिसूं लागलें. हा त्याचा हेतु सिद्ध होण्यासाठीं त्यानें योजिलेली युक्ति मोठी मार्मिक होती यांत संशय नाहीं. ती अशी.

**६. वैवाहिक संबंधः**—मलिक-अंबर यास मलिक-अझीज उर्फ फातखान या नांवाचा एक मुलगा होता. त्याला आदिलशहानें आपल्या पदरीं गुलाम म्हणून ठेवावें व दुसऱ्या गुलामाच्या मुलीशीं त्याचा विवाह करावा अशी मागणी अंबरानें केली. अंबराची ही विनंति आदिलशहानें मान्य केली व आपल्या पदरच्या याकुतखानाची मुलगी फातखानास दिली. हा

याकुतखान आदिलशहाच्या मोठ्या कृपेंतील अंमलदार असून त्यावर त्याचा मोठा विश्वास होता. या विवाहांत हुंड्याची रकम आदिलशहानें आपल्या खजिन्यांतून दिली; समारंभांतील थाट फारच मोठा होता. वीस हजार होनांचें तर दारूकामच उडविण्यांत आलें. हा विवाहोत्सव सारखा चाळीस दिवस चालू होता. तारीख ५ फेब्रुवारी सन १६०९ रोजीं फातखान हा वधूस बरोबर घेऊन निजामशाही राजधानीस म्हणजे जुन्नरास येण्यास निघाला. हा मलिक अझीज उर्फ फातखान मोठासा कृर्तृत्ववान नव्हता; किंबहुना चिडखोर व दुष्टहि होता. परंतु तो मलिक-अंबराचा मुलगा असल्यानें मलिक-अंबराच्या हयातींत फातखानाकडेस कोणींहि फारसें लक्ष दिलें नाहीं, अंबराच्या पश्चात् मात्र फातखानानें आपले गुण उधळले व शेवटीं त्याचा खूनहि झाला. हा एकंदर इतिहास रोमांचकारी आहे. यांतील महत्त्वाचा भाग पुढें प्रसंगानुसार येणारच आहे. या फातखानाच्या कारकिर्दींतच लुखजी जाधवराव व शहाजी हे प्रख्यात मराठे सरदार चमकले. असो. फातखानाच्या विवाहानंतर काय राजकारण झालें तें पुढील प्रकरणांत समजेल.

---

# प्रकरण ६ वें

# मोगलांशीं युद्ध

## इ. स. १६१० ते इ. स. १६२४

**मुद्दे**—१. खानेखानान याचा दक्षिण जिंकण्याचा उपक्रम. २. मोगली फौज कचाट्यांत सांपडली. ३. अंबराच्या एका तुकडीचा नाश. ४. पराजय. ५. तहाचा परिणाम. ६. युद्धांतील धामधुम. ७. अंबर व मोगल यांचा तह. ८. गनिमीकाव्याचें महत्त्व. ९. शहाजीची प्रसिद्धि.

**१. खानेखानान याचा दक्षिण जिंकण्याचा उपक्रम :**—मोगली सरदार खानेखानान याच्या हातून दक्षिण जिंकण्याचें कार्य होत नाहीं असें पाहून जहांगीर बादशहानें त्यास सन १६०८ मध्यें परत दिल्लीस बोलाविलें व तो त्याप्रमाणें दिल्लीस गेला हें मागील प्रकरणांत सांगितलें. त्यानंतर पुढें काय झालें हें आतां सांगावयाचें आहे. सरदार खानेखानान हा दिल्लीस गेल्यावर त्यानें जहांगीर बादशहाची अशी समजूत

घातली कीं, पुरेशी मोगली फौज नसल्यानें-जी थोडी होती-ती मलिक-अंबरापुढें हताश झाली. त्यावरून बादशहानें त्याच्या-बरोबर आणखी बरेंच सैन्य देऊन त्याला इ. स. १६१० मध्यें पुनः दक्षिणेंत पाटविलें. त्यानें रामेश्वरापर्यंत सगळी दक्षिण जिंकावी असें यावेळीं ठरलें होतें. दिल्लीहून निघून त्यानें नर्मदेवर मुक्काम केला व राजपुत्र पर्विजपासून दक्षिणेंतील कामाचा हवाला सोंपून घेतला. राजा मानसिंग, अमीरुल् उमराव शरफखान, असफखान, खानदेशांतील हिंदू व अफगाण सरदार इत्यादि पुष्कळांनीं खानेखानान यास साह्य करावें अशीं फर्मानेंहि सुटलीं, व त्याप्रमाणें साह्यकर्त्यांसह मोगलांची फौज दक्षिणेंत येऊन तिनें युद्धास सुरवात केली. हें युद्ध मोगल व निजामशाही फौजा यांमध्यें होतें. मोगलांचा पुढारी खानेखानान व निजामशाहीचा पुढारी मलिक-अंबर हें प्रसिद्धच आहे. मोगली फौजां व निजामशाही फौजा यांचे युद्धप्रसंग सन १६१० नंतर कांहीं वर्षें अनेक वेळां झाले. त्या प्रत्येक प्रसंगांत मलिक-अंबरच मुख्यतः असल्यानें ते प्रसंग थोड्या विस्तारानें आतां निवेदन करूं. या धुमश्चक्रींत मलिक-अंबराचें चातुर्य व शौर्यहि प्रसंगानुसार प्रकट झालें होतें. मोगलांचे इतर सरदार व खानेखानान यांचा पुढें कांहीं

कारणानें बेबनाव झाला. तो वृत्तांत पुढील प्रकरणांत नमूद करूं.

**२. मोगली फौज कचाट्यांत सांपडली :**—मोगल व अंबर यांचा झगडा चालू होता. मोगलांचें बळ दिवसेंदिवस वाढत असून अंबराच्या फौजेंतील सरदारांत फूटहि अधिकाधिक होत चालली होती, त्यामुळें बिकट परिस्थिति प्राप्त झाली. अंबराचें सैन्य गनिमीकाव्यानेंच लढत असल्यानें कांहीं बचाव होत होता. मोगली फौजेनें एकदम छापा घालावा असें अंबराकडील फुटलेले हबशी सरदार मोगलांचा मुख्य जो शहानवाजखान यास सांगून पाठवीत होते. परंतु अधिक फौजेचा भरणा दिल्लीहून न झाल्यामुळें तोहि वेळ घालवीत होता. त्यामुळें मोगली सरदारांना असें वाटूं लागलें कीं आपली निष्कारण कत्तल होत आहे.

**३. अंबराच्या फौजेचा नाश:**—असा प्रकार चालत असतां एके दिवशीं फुटलेल्या हबशी सरदारांनीं मोगलांस अशी बातमी दिली कीं, ' चाळीस हजार घोडेस्वारांनिशी अंबर तुमच्यावर चालून येत आहे, ' त्या वेळीं मोगलांची फौज फक्त दहा हजारच होती. त्यामुळें मोगलांनीं एका खेड्यांत तळ दिला. त्या खेड्याभोंवतीं पटण नदी असून तिच्या योगें खोल डोह

तयार झालेला होता. ह्या डोहाच्या आश्रयानें मोगली फौज मागें दूर उभी राहिली. त्या फौजेच्या संरक्षणास तोफखाना सिद्ध ठेविला. इकडे अंबरानें सतरा-अठरा वर्षांच्या दहा हजार हबशी स्वारांचा रिसाला मोगलांवर पाठविला. हे दहा हजार जवान घोडेस्वार एकदम त्या डोहांत येऊन रुतले. घोडे व स्वार सांखळीनें बांधल्यासारखेच झाले. त्यांना पुढें अथवा मागें सरतांच येईना. या दहा हजार स्वारांच्या जमावावर मोगलांनीं एकदम तोफखाना डागला व सर्वांनाच उडवून दिलें.

४. **पराजय**:—अंबराच्या फौजेंतील उजवी व डावी-कडील सरदार नाराजीमुळें एकदम पळून गेले. तें पाहून मोगलांनीं अंबराच्या फौजेचा पाठलाग केला व हजारों सैनिकांस यमसदनास पाठविलें. त्यामुळें यावेळीं अंबराचा फार मोठा पराजय झाला. मोगली फौजेस लूटहि पुष्कळ मिळाली. पटण किल्ल्यापासून खडकीपर्यंतचा सगळा प्रदेश मोगलांनीं अगदीं उजाड केला. अंबराच्या वाड्याशिवाय सर्व घरें-दारें लुटून फस्त केलीं. अंबरानें मोठ्या मुष्किलीनें दौलताबादेच्या किल्ल्यांत वास्तव्य केलें. शेवटीं बारा लक्ष होन मोगलांस देऊन अंबरानें तह केला व मोगली फौज परत फिरली.

५. **तहाचा परिणाम**:—हा तह पुढें चांगला आठ-

दहा वर्षें चालला. इकडे दिल्लीस मोगलाईमध्यें भानगडी सुरूं झाल्या. इतर बंधूंना ठार करून आपणच मोगलाई बळकवावी असा प्रयत्न शहाजहान वगैरे राजकुमारांत सुरूं झाला. त्यामुळें सरदारांतहि अनेक तट पडले. सन १६२०—२१ च्या सुमारास शहाजादा खुसरू हाहि इतर शहाजाद्यांबरोबर दिल्लीसच होता. त्याला नाहींसा करण्यासाठीं शहाजहान (म्हणजे खुर्रम्) च्या संमतीनें खानेखानान या दक्षिणेंतील सरदारानें मलिक-अंबरास आपलेकडेस वळवून त्याच्याकडून नर्मदेपासून निजामशाहीप्रांतापर्यंत सगळा मोगल मुलुख खैदानमैदान करविला. हेतु हा कीं, खुसरूच्या हातून दक्षिणेंत बंदोबस्त राहत नाहीं असें जहांगीर बादशहाला दाखवून शहाजहान यास त्यानें दक्षिणेंत पाठवावें. तो आला म्हणजे खुसरूचा निकाल परभारें तोच लावील. इकडे मलिक-अंबरानें संकेताप्रमाणें मोगली मुलुख तर वैराण केलाच, पण महालदारखानाबरोबर वीस हजार स्वार पाठवून वऱ्हाड, खानदेश हे प्रांतहि लुटून तेथील मोगली अंमलदार हुसकावून लाविले. सारांश, मलिक-अंबरानें मोगलांची खात्री करून दिली कीं, दक्षिणेंतील लोकांशीं युद्ध करणें हें उत्तरे-कडील राजपुत, जाट, शिख इत्यादि लोकांशीं युद्ध करण्या-सारखें झटपट निर्णयाचें नसून फार दिरंगाईचें, कष्टदायक व चिंतास्पद असतें. मोगलांचे सगळे डावपेंच उत्तरेकडेस जसे

यशस्वी झाले तसे ते दक्षिणेकडेस न होतां त्यांच्याच आंगलट आले. मराठी फौजांची चपलता व मलिक-अंबराचें चातुर्य यापुढें मोगली सेना हताश होऊन गेली.

६. **युद्धांतील धामधुम** :—मोगल व निजामशाही फौज यांचें युद्ध चालू झाल्यावर मोगलांची फौज खानेखानान यानें ब-हाणपुराजवळ आणिली. खानेखानान यानें निजामशाही-वर एकदम जोराचा मारा करण्याचें ठरवून सन १६१० च्या पावसाळ्यांत ब-हाणपुराहून त्यानें एकदम कूच केलें व अहमदनगरच्या आसपास दंगा चालविला. ही अशी सुसंधि आलेली पाहून मलिक-अंबरानें तिचा पूर्ण लाभ करून घेण्याचें ठर-वून मराठ्यांच्या फौजा मोगली फौजेवर रवाना केल्या. त्यांनीं वारंवार हल्ले चढवून, घाट, खिंडी यांत मोगली फौजेस अगदीं हैराण करून सोडिलें. धान्य, गवत व इतर सर्व वस्तू मोगली फौजे-कडेस मिळण्याचें बंद होतांच ती फौज खानेखानान याला शिव्याशाप देऊं लागली. दाणावैरणाच्या या अडचणीमुळें मोगली फौजेला मूर्तिमंत दुष्काळ दिसूं लागला. त्यामुळें खानेखानान यानें मलिक-अंबरानें सांगितल्याप्रमाणें तह मान्य करून तो ब-हाणपुरास परत गेला. याप्रमाणें मोगली फौजेचा फार मोठा पराजय झाल्यामुळें सगळे सरदार फार संतापले.

खानजहान, मानसिंग, अबदुल्लाखान असे मोठमोठे सरदार सन १६११ मध्यें मलिक-अंबरावर चालून गेले. यांतील अबदुल्लाखान हा एकटाच घाटांत शिरला. मलिक-अंबरानें तें पाहून गनिमी युद्धास प्रारंभ केला. अबदुल्लाखानाच्या फौजेवर हल्ले सुरूं झाले; त्या फौजेस मिळणारा दाणा-गोटा व गवत-काडी बंद करण्यांत आलीं. त्या फौजेचें शिलकी धान्य लुटून नेण्यास सुरवात झाली. त्यांचे घोडे, उंट इत्यादि जनावरेंहि मलिक-अंबराच्या लोकांनीं पकडलीं. या मराठी फौजेला अडवून, तिला ठासून उभें राहून लढाई देण्यास प्रवृत्त करणें अबदुल्ला-खानाच्या फौजेस शक्य नव्हतें, त्यामुळें तो अगदीं मेटाकुटीस आला. अशा प्रकारची मोगली फौजेची धांवपळ व लांडगेतोड चालू असतां ती फौज मोठ्या शिकस्तीनें दौलताबादेस जाऊन पोंचली. हें दौलताबाद म्हणजे मलिक-अंबराच्या मराठी फौजांची मुख्य गुहाच होय. यानंतर मोगलांची फौज मोठ्या शिकस्तीनें बागलाणांत जाऊन तेथून ती गुजरातेमध्यें जीव बचावून गेली. याप्रमाणें मोगली फौजेचा हा आणखी एक फार मोठा पराजय मलिक-अंबरानें केला त्यामुळें जहांगीर बादशाहा फारच रागावला व स्वतःच मलिक-अंबराशीं सामना द्यावा असा विचार करूं लागला. खानेखानान यालाच पुनः मोठी फौज देऊन मलिक-अंबरावर त्यानें रवाना केलें. या वेळीं

मोगलांच्या शहानवाजखानाच्या हाताखालीं असलेले जाधवराव, बापु काटे यांच्यासारखे सरदारहि प्रथम मलिक-अंबराकडे होते. पण ते त्याला सोडून शहानवाजखानाकडे गेले. खानेखानानची ही सिद्धता पाहून मलिक-अंबरानें विजापुर व गोवळकोंडा यांच्याशीं संधान जुळविलें. परंतु त्यापासून त्याचा फारसा लाभ झाला नाहीं. इतक्यांत शहानवाजखानानें मलिक-अंबरावर चाल केली. ही लढाई तिसरे प्रहरीं दोन तासपर्यंत फार जोरानें चालली. या लढाईत शेवटीं मलिक-अंबर हा पळून गेला व मोगली फौज विजयी झाली. या फौजेनें दुसरे दिवशीं खडकीवर चाल केली व तें शहर उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. हें युद्ध सन १६१२ मधील होय.

**७. मलिक-अंबर व मोगल यांचा तह :—** मोगल व मलिक-अंबर यांच्या युद्धाची धामधुम चार-पांच वर्षें चालली व त्या अवधींत सैन्यं, फौज, शस्त्रें व द्रव्य यांचा भरपूर पुरवठा मोगलांस वेळोवेळीं होत गेल्यामुळें मलिक-अंबर अगदीं हताश होऊन गेला व सन १६१७ मध्यें त्यानें मोगलांशीं तह केला. बादशहा जहांगीर व शहाजादा शहाजहान हे दक्षिणेंत आल्यानें मलिक-अंबराचा याप्रमाणें पराजय झाला यांत संशय नाहीं. याप्रमाणें तह झाल्यावर जहांगीर बादशहा

दिल्लीकडे वळला. तो गेल्यावर मोगली सरदारांत झगडे सुरू झाले. हा प्रकार दोन-चार वर्षे चालला, तो पाहून सन १६२० च्या सुमारास मलिक-अंबर यानें पूर्वीचा तह मोडला व मोगली फौजांवर मारा सुरू केला. या लढायांमध्यें मोगल व निजामशहा या दोघांच्याहि प्रदेशाची फार नासाडी झाली. बाळापुर* व बऱ्हाणपुर येथें मोगल हे वेढ्यांत सांपडले आणि मलिक-अंबराच्या दक्षिणी लोकांच्या फौजा मांडूपर्यंत चमकल्या. अशा आणीबाणीच्या वेळीं मोंगलांची सत्ता शहाजादा (म्हणजे खुर्रम्) शहाजहानकडे होती, त्यामुळें मोगली फौज त्याकडे मोठ्या आशापूर्ण मनोदयानें पाहूं लागली; परंतु त्याचा डाव निराळाच असल्यानें तो या धामधुमीकडेस दुर्लक्षच करी. मागें सांगितल्याप्रमाणें त्याचा डाव असा होता कीं, त्याचा खुसरू या नांवाचा एक भाऊ होता तो आपल्या हातीं यावा. आपल्या सख्या भावांना ठार मारून आपण राज्य करावें हा मोगलांचा सांप्रदायच होता. हे प्रकार राजपुतांमध्येंहि दिसतात. परंतु मराठ्यांनीं मात्र स्वार्थपरायणतेनें असले

*टीप :—यानंतर शंभर वर्षांनीं याच बाळापुर येथील लढाईत दमाजीबाबा गायकवाडांनीं तलवार गाजवून 'समशेरबहादुर' ही पदवी मिळविली. हेच दमाजीबाबा बडोद्याच्या गायकवाड राजघराण्याचे पहिले प्रख्यात पुरुष होत.

अत्याचार केल्याचें आढळत नाहीं. नारायणराव पेशव्याच्या खुनामुळें लोकमत किती प्रक्षुब्ध झालें होतें हें प्रसिद्धच आहे. असो. आपल्या भावाला नाहींसा करून टाकण्यासाठींच शहाजहानचा प्रयत्न असून त्यानें खुसरूची मागणी केली होती. एकंदर रियासतीमध्यें राज्य करण्यास जो समर्थ व योग्य असेल त्यानेंच राजपद स्वीकारावें असा नियम महंमद पैगंबरानें अरबस्तानांत इसवी सनाच्या सहाव्या शतकांत घालून दिलेला असल्यानें बहुधा प्रत्येक मुसलमानी राजाला राज्य मिळविण्यासाठीं स्वतःची पात्रता सिद्ध करावी लागत असे. याच कारणामुळें शहाजहान यानें खुसरूची मागणी निकडीनें केली होती. शेवटीं निरुपाय होऊन जहांगीर बादशहानें खुसरूला शहाजहानच्या स्वाधीन केलें. याप्रमाणें आपले मनोरथ पूर्ण होतांच शहाजहान यानें आपला मोर्चा दक्षिणेकडेस वळविला, त्याबरोबर तिकडील युद्धाचा कल बदलून मोगली सैन्य विजयी होऊं लागलें. यावेळीं शहाजी भोसल्याचे चुलत भाऊ संभाजी, खेलोजी, मल्लाजी, मंबाजी, नागोजी, परसोजी, त्रिंबकजी व बनाजी हे निजामशाही सैन्यांत प्रविष्ट झाले. ते मलिक-अंबराच्या मर्जीप्रमाणेंच वागत असत. एकदां तर त्यांनीं शहाजीविरुद्धच कांहीं वृत्तांत मलिक-अंबरास समजाविला, त्यामुळें शहाजीवर मलिक-अंबराची इतराजी झाली व शहाजी हा निजामशाही

सोडून जाण्याच्या विचारांत होता. पण पुढें तें प्रकरण विझलें व शहाजी निजामशाहींतच राहिला. मलिक-अंबरानें निवडक व युद्धोत्सुक सरदार आपल्याबरोबर घेऊन मोगलांशीं युद्ध सुरू केलें. त्या युद्धांत मोगली फौजांसहि कांहीं जय मिळाले पण त्या फौजेची पीछेहाट मात्र फार झाली. कारण समोरासमोर ठासून उभे राहून केलेल्या लढायांत मराठी फौजांचा पराजय होत असे, पण गनिमीकाव्याच्या युद्धांत मोगली फौजा हटकून जेरीस येत. अवघ्या तीनच महिन्यांत अहंमदनगर व वऱ्हाड मलिक-अंबरानें सर केलें; यानंतर मोगलांचा सेनासमुद्र बाळापुराकडे वळला. पण मलिक-अंबरानें तिकडील प्रदेश अगोदरच वैराण करून टाकिला होता, त्यामुळें मोगली फौज फार हैराण झाली. जहांगीर बादशहाच्या आत्मचरित्रांत दक्षिणच्या या भानगडींची पुष्कळ हकीकत मिळते; त्यांत मलिक-अंबराचा उल्लेख अत्यंत निंद्य शब्दांनीं केलेला आहे. अहंमदनगरावर खानेखानान होता, त्यास मलिक-अंबरानें फौजेनिशीं वेढा घातला. तेव्हां खानेखानानचे मदतीस बादशहानें आपला मुलगा पर्विज यांस बऱ्हाणपुराहून पाठविलें तें साल सन १६०८ होय. यावेळीं खानेखानानचे जोडीस पुढें प्रसिद्धीस आलेला खानजहान लोदी होता. मलिक-अंबराच्या मराठी फौजांनीं पर्विजच्या फौजेस असा कांहीं त्रास दिला कीं, ती

फौज अहंमदनगरचे मदतीस येऊं शकली नाहीं. तेव्हां खाने-खानानचा नाइलाज होऊन तो अहंमदनगर मलिक-अंबराचे हवालीं करून आपण बऱ्हाणपुरास परत गेला. त्यावरून खानजहान लोदीनें स्वतः बादशहास स्पष्ट कळविलें कीं, 'खाने-खानानचे हातून दक्षिणचा बंदोबस्त बिलकुल होणार नाहीं. मला तीस हजार स्वारांची मदत द्या म्हणजे मी समग्र दक्षिण जिंकून आपले हवालीं करतों.' त्यावरून सन १६०९ त बादशहानें खानेखानानास परत बोलावून त्याचे जागीं खानजहानची नेमणूक केली. तथापि खानजहानचे हातून सुद्धां मलिक-अंबराचा प्रतिकार झाला नाहीं. सन १६१२ त मोगली फौज दौलताबादेवर चालून आली असतां मलिक-अंबरानें तिचा फन्ना उडविला, तेव्हां उरलीसुरली फौज जीव घेऊन बऱ्हाणपुरास परत गेली........कांहीं दिवसांनीं मलिक-अंबरास ठार मारण्याचे प्रयत्न झाले, पण ते सिद्धीस गेले नाहींत. सन १६१२ त मलिक-अंबराकडील कांहीं मराठे सरदारांस फोडून मोगलांनीं आपल्या बाजूस आणिलें. बहुधा यांत जिजाबाईचा बाप लखुजी जाधवराव असावा. कारण तो सन १६१२ पासूनच उदास झाला असावा असें जहांगीरच्या चरित्रावरून दिसतें. आणि यावरूनच शिवभारतांतील लखुजीचा वृत्तांत इतिहास नसून काव्यच ठरतो. असो. सन १६२१

मध्यें ही फुटलेली मराठी फौज मदतीस घेऊन मोगल सैन्य पुनरपि खडकीवर चालून गेलें. यावेळीं शहाजादा शहाजहानहि चाळीस हजार फौज घेऊन मलिक-अंबरावर चालून गेला होता. तेव्हां मलिक-अंबरानें मुख्य निजामशहास अगोदरच दौलताबादेस नेऊन ठेविलें होतें, त्यामुळें तो तेथें सुरक्षित राहिला. खडकी येथें मोगल व मलिक-अंबर यांचा तुंबळ रण-संग्राम होऊन मलिक-अंबराचा पूर्णपणें पराभव झाला व तो रणक्षेत्रावरून पळून गेला. खडकीच्या राजधानींत गेल्या वीस वर्षांत मलिक-अंबरानें उभारिलेल्या मोठमोठ्या इमारती मोगलांनीं पाडून अगदीं जमीनदोस्त केल्या आणि नंतर मोगल सैन्य अहंमदनगरकडेस वळलें. हें पाहतांच मलिक-अंबरानें तहाचें बोलणें सुरू केलें. दिल्लीस जहांगीर बादशहाची प्रकृति ढासळली आणि त्याची बेगम नूरजहान हिचें राजकारण जोरांत चालू झालें. अशा वेळीं शहाजहान यासहि दिल्लीसच अस-ण्याची आवश्यकता वाटूं लागली; त्यामुळें त्यानें मलिक-अंबराशीं तह केला. या तहानें गेल्या दोन वर्षांत मलिक-अंबरानें जिंकलेला मोगलांचा प्रदेश परत मोगलांस मिळाला, इतकेंच नव्हें पण त्या प्रदेशच्या लगतचा चौदा चौदा कोसांचा मुलूखहि मोगलांसच मिळाला. या शिवाय मोगलांना लढाईसाठीं जो खर्च झाला त्याबद्दल आणि मोगलांचें वर्चस्व स्थापण्यासाठीं,

क्र. ६१५६१

आदिलशाही (१८ लक्ष), निजामशाही (१२ लक्ष) व कुतुबशाही (२० लक्ष) मिळून पन्नास लक्ष रुपयांची खंडणी आदिलशहा, निजामशहा व कुतुबशहा या तिघांवर मोगलांनीं लादली. याप्रमाणें तह झाल्यावर युद्धाची धुमश्चक्री थांबली. शहाजहान दिल्लीस गेल्यावर त्यास तेथें काय दिसलें व तो परत दक्षिणेंत येऊन मलिक-अंबराच्या साह्यानें कसा राहिला हें पुढें निवेदन करूं.

**८. गनिमी पद्धतीच्या लढाईचें महत्त्वः**—मोगल व मलिक-अंबर यांच्या लढाया सन १६२० मध्यें झाल्या व मलिक-अंबरानें आपला म्हणजे निजामशाहीचा मुलुख खैदान-मैदान करून मग तेथून पळ काढिला. त्यामुळें मोगली फौजेस पुढें दाणावैरणीची फार आपत्ति झाली व शेवटीं कसाबसा तह करणें भाग पडलें हें वर सांगितलें. युद्धशास्त्रांतील ही एक प्रख्यात, सर्वमान्य व अचुक अशी युक्ति आहे. कृष्णाच्या मागें कालयमन लागला असतांना कृष्णानें एका रात्रीं सर्व द्वारकानगरी रिकामी केली हें प्राचीन कथानक पुराणांत आहे. त्या कथानकाचें सारहि असेंच होय. अगदीं अलीकडे (इ. स. १७२५) गुजरातेंत रुस्तमखान व हमीदखान या मोगली सरदारांचें आपसांत युद्ध झालें तेव्हां रुस्तमखानाचा पराजय

झाला. या युद्धांत गायकवाडांचे प्रख्यात पूर्वज पिलाजीबावाहि गुंतले होते. रुस्तमखान मोठ्या आशेनें पेटलादजवळच्या वसो गांवीं गेला पण फार निराश झाला. कारण पूर्वरात्रींच तें गांव प्राचीन काळच्या द्वारकानगरीप्रमाणें अगदीं ओसाड दिसलें. कारण तेथील नागरीक गांव सोडून पूर्वींच निघून गेले होते. या वसो गांवांतच रुस्तम अलीखान मारला गेला. हा सर्व वृत्तांत गायकवाडांच्या इतिहासांत सविस्तर वर्णन केलेला आढळतो. विजयी सैन्य मागें लागल्यास याप्रमाणें गांवें ओसाड करून व पिकें लुटून अथवा नष्ट करून पळ काढण्याची युक्ति मलिक-अंबरानें सुरू केली व पुढें ती मराठ्यांनीं अगदीं आत्मसात् केली. त्यामुळें मोगली फौजा हैराण होऊन पराभव पावल्या आणि त्यांच्या तवारिखकारांनीं मराठ्यांस लुटारू म्हणून संबोधून आपले इतिहास लिहून ठेविले. पुढें इंग्रजांनीं त्यांचा कित्ता गिरवून मराठ्यांस लुटारू या विशेषणांनीं संबोधिलें. परंतु लुटारू बनण्यास भाग पाडण्यासारखी परिस्थितिच उत्पन्न झाली होती हें विसरतां नये. शिवाय ही युक्ति मराठ्यांनींच अठराव्या शतकांत हिंदुस्थानांत उत्पन्न केली असें नसून युरोपांत चवथ्या शतकांतहि अस्तित्वांत होती असें दिसतें. रोमचा सम्राट जूलियन यानें ईराणवर इ. स. ३६२ मध्यें स्वारी केली तेव्हां तो असीरियावर चालून गेला. त्याचें अफाट

सैन्य पाहून असीरियाच्या लोकांनीं नगर ओस केलें व उभी शेतें सुद्धां जाळून टाकिलीं आणि ते पळून गेले. पुढें जूलियन तेथें आल्यावर अन्नावाचून फौजेचे हाल होऊं लागले व इराणी फौजा गनिमीकाव्यानें त्या रोमच्या फौजेवर मारा करूं लागल्या, तेव्हां जूलियन मोठ्या पेंचात सांपडून मार्गे पळ काढण्याच्या विचारांत गढला. पुढें त्याचा खून झाला व त्याच्यामागून रोमच्या साम्राज्यावर अधिष्ठित झालेल्या एका बादशहानें मोठ्या नामुष्कीचा तह घडवून आणिला इत्यादि मोठें मनोरंजक वृत्त गिबन यानें आपल्या प्रचंड इतिहासांत दिलें असून तें सारांशरूपानें 'फ्रॉम् सीझर टु सुलतान' या श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या प्रख्यात पुस्तकांतहि घेतलें आहे. मलिक-अंबराच्या चरित्राशीं त्यांतील एका प्रसंगाचा संबंध आल्यानें त्या पुस्तकाचा निर्देश केला इतकेंच. मलिक-अंबरानें जी युक्ति योजिली ती मोठी रामबाण युक्ति होती व युरोप आणि इराण येथील प्रख्यात सेनापती तीच युक्ति प्रसंगविशेषीं योजीत असत हें पाहिलें म्हणजे मलिक-अंबराच्या युद्धकलाविशारदत्वाचें मोठें कौतुक वाटतें. कारण त्याच्यापूर्वीं मोगलांनीं ही युक्ति योजिलेली दिसत नाहीं.

९. **शहाजीची प्रसिद्धी :**—शहाजहानच्या मागणी-

प्रमाणें जहांगीर बादशहानें आपला दुसरा मुलगा व शहाजहान-चा भाऊ खुशरू यांस शहाजहानच्या स्वाधीन केलें हें मागें परिच्छेद ७ मध्यें सांगितलेंच आहे. शहाजहाननें त्या भावाला या जगांतून मोठ्या युक्तीनें सन १६२१ मध्येंच नाहींसा केला. हा प्रकार वाचनीय आहे परंतु त्याचा मलिक-अंबराच्या चरित्राशीं मुळींच संबंध नसल्यानें आपण तो सोडून देऊं व आपल्या कथानकाचा धागा पुढें चालू करूं. या सुमारास म्हणजे सन १६२० मध्यें पुण्यावर (विजापुरकर) आदिल-शहाची सत्ता होती असें दिसतें. त्या वेळीं विजापुरकराचा सरदार रायाराव हा पुण्याच्या बंदोबस्तास होता. तेव्हां भुलेश्वर अथवा दौलतमंगळ या किल्ल्यावरून पुण्यास सत्ता गाजवितां येत असे. आदिलशहा व निजामशहा यांचा बेबनाव झाल्याचें कळतांच आदिलशहाचा म्हणजेच विजापुरकरांचा सरदार रायाराव यानें जबरदस्तीनें पैसा वसूल करण्यास प्रारंभ केला, हें वर्तमान समजतांच मलिक-अंबर यानें रायारावावर शहाजीस पाठविलें. शहाजीनें पुण्यास जाऊन रायारावाची हकालपट्टी केली. याप्रमाणें शहाजीचें शौर्य पाहून मलिक-अंबरानें त्याला पुणें व शिरवळ येथील मुख्य व्यवस्थापक म्हणजे मोकाशी नेमिलें. परंतु या नेमणुकीमुळें आदिलशहा व निजामशहा यांचें वैर मात्र अधिक वाढलें. इतक्यांत मलिक-अंबरानें विजापुरावर स्वारी केली व

भाटवडीजवळ सैन्याचा तळ दिला. भाटवडी हें गांव अहंमद-नगराहून पांच कोसावर आहे. या ठिकाणीं म्हणजे भाटवडी येथें उभय पक्षाचें युद्ध सन १६२४ मध्यें झालें. या युद्धांत पुष्कळ मराठा सरदारांनीं चांगलाच पराक्रम गाजविला. शहाजीचा भाऊ शरीफजी हा मंजोहरखान नांवाच्या मोगल सर-दाराशीं लढतांना कामास आला तें पाहून शहाजीनें मंजोहर-खानाशीं सामना देऊन त्याला पळावयास लाविलें. सन १६२४ च्या भाटवडीच्या युद्धांत मलिक-अंबर यास यश मिळालें. पण त्या युद्धाला व यशालाहि कारण विजापुरच्या आदिलशहाची एक बेगम होती. कारण तिनेंच विजापुरची कच्ची बातमी मलिक-अंबरास पुरवून स्वारीस उत्साह आणिला होता. परंतु हें वर्तमान आदिलशहा यास कळलें व त्यानें त्या बेगमेचा शिरःच्छेद केला. असो. मोगलांच्या दक्षिणेवरील स्वारीचा वृत्तांत बाकी आहे तो आतां पुढील प्रकरणांत कथन करूं.

शहाजीचें चरित्र ऐतिहासिक दृष्टीनें कोणीहि लिहिलें नाहीं. त्याच्या पदरच्या स्तुतिपाठकानें लिहिलेल्या काव्याच्या आधारानें लिहिलेलें चरित्र ऐतिहासिक दृष्टीला पटणार नाहीं. कारण तें चरित्र महाराष्ट्रीयाला आपलेपणाच्या दृष्टीनें कौतुका-स्पद असलें तरी ऐतिहासिक दृष्टीला तें कल्पित कथनच

वाटेल. म्हणून इतिहासदृष्ट्या शहाजीचें अल्प चरित्र येथेंच सांगतों.

शहाजी ऐन पंचविशींतच असल्यानें मलिक-अंबराच्या कारकिर्दींत प्रथमच तो लहानसा पागेदार म्हणून वावरूं लागला (इ. स. १६२०). या वेळीं त्याचा सासरा लुकजी जाधवराव निजामशाही सोडून मोंगलांकडेस गेल्यानें शहाजीच्या बढतीला त्याचें साह्य झालें नाहीं हें प्रसिद्धच आहे. मलिक-अंबराच्या पश्चात् चार-पांच वर्षांतच शहाजी दोन हजार स्वार पदरीं बाळगून एक लहानसा सेनापति अथवा पागेदार म्हणून निजामशाहींत वावरूं लागला. मलिक-अंबराचा मुलगा फातखान यानें शहाजीची परीक्षा करून त्याला नांवालौकिकास चढविलें. तोंपर्यंत तो वडिलोपार्जित जहागिरीवरच अवलंबून असे.

निजामशाही आटोपल्यावर शहाजीनें आदिलशाहींत चांगलीच तलवार गाजविली व कर्नाटकांतील हिंदु राज्यें नष्ट केलीं. आदिलशाहीची नोकरी करण्यापलीकडे त्याचें कांहींहि ध्येय नव्हतें, पुढें कांहीं कारणानें आदिलशाहींत त्याचें बिनसलें व त्याची जहागीर जप्त झाली. तेव्हां 'आम्ही लढाऊ (राजपूत) लोक; कोठेंहि तलवार गाजवूं अथवा हरि हरि म्हणूं' असें तो

म्हणतो. सारांश, स्वतंत्र व्हावें, स्वराज्य स्थापावें हें त्याच्या मानसीं कधींहि नव्हतें. **ती कल्पना एकट्या छत्रपति शिवाजी महाराजांचीच होती.** शहाजीची ही सर्व माहिती येथें मुद्दामच दिली आहे. आतां मलिक-अंबराचा शेवटचा भाग पुढील प्रकरणांत सांगून त्याचें चरित्र संपवूं.

---

## प्रकरण ७ वें

# शेवटच्या चळवळी

### इ. स. १६२४ ते इ. स. १६२६

मुद्दे—१. निजामशाहीचे सरदार मलिक-अंबराचा द्वेष करितात. २. आदिलशहाची कृपा. ३. नूरजहानचें राजकारण व शहाजहानचें बंड. ४. महोबतखान, मलिक-अंबर व आदिलशहा यांचे डावपेंच. ५. मलिक-अंबराचा विजापुराला वेढा. ६. मलिक-अंबर अहंमदनगरास परत येतो. ७. भाटवडीचें युद्ध. ८. मलिक-अंबर व शहाजहान यांची मैत्री. ९. आदिलशहा व मोगल यांचें सख्य. १०. इतर लढाया. ११. मलिक-अंबराचें पलायन. १२. मलिक-अंबराचा धाक. १३. मलिक-अंबराचा पराक्रम. १४. मलिक-अंबराचा मृत्यु. १५. योग्यता. १६. मलिक-अंबराचे मुलगे.

**१. निजामशाहीचे सरदार मलिक-अंबरचा द्वेष करितात :**—मागील प्रकरणांतील पहिल्याच कलमांत (प्रकरण

६ कलम १) जहांगीर बादशहानें दक्षिणेवरील स्वारीसाठीं नामांकित सरदार पाठविले हें सांगितलें. ते सरदार अगणित सैन्य घेऊन दक्षिणेंत आलेले पाहतांच मलिक-अंबरानें गनिमी पद्धतीनें त्यांच्याशीं लढण्यास सुरुवात केली. त्यानें प्रथम मोगली फौजेचें दाणावैरण बंद करून तिला उपाशी तडफडावयास लाविलें, म्हणून ती असंख्य फौज सतत सहा महिने तडफडत राहिली होती. मलिक-अंबराच्या गनिमीकाव्यामुळें मोगली फौज अगदीं जेर झाली. युद्धांत पराजय, माणसांची हानि व जनावरांसुद्धां सर्वांस उपासमार अशा त्रिविध आपत्तीमुळें मोगलांचे सरदार कंटाळून व त्रासून गेले; त्यांना खानेखानान याचाच संशय येऊन त्यांनीं दिल्लीस कळविलें कीं, "खानेखानान हा मलिक-अंबरास सामील झाला असून निजामशाहीच्या उत्पन्नाचा तिसरा हिस्सा त्याला मिळत असतो." हा वृत्तांत जहांगीर यास कळल्यावर त्यानें खानेखानान याचा मुलगा इरजखान यास शहा नवाजखान अशी पदवी देऊन नव्या फौजेसह दक्षिणेंत पाठविलें. तो इरजखान नर्मदेपर्यंत येतांच मलिक-अंबरानें त्याला अडविलें. त्या अडविणारांमध्यें मलिक-अंबराची निवडक फौज व निजामशाही सरदार होते. त्यांत जाधवराव, आदमखान, आतराखान, महालदारखान, बाबाजी काटे, भोसले (शहाजी?), उदाजीराव,

पेशावखान हे मुख्य होते. यांत इखलासखान हा मुख्य सेनापति होता. प्रत्यक्ष युद्धक्षेत्रावर मलिक-अंबर उपस्थित नसल्यामुळें इतर सरदारांना वैषम्य व अपमान वाटूं लागला. सर्वसाधारण मनुष्यस्वभावाप्रमाणें ते सरदार मलिक-अंबराचा द्वेष करूं लागले. त्यांनीं या वेळीं आपला सेनापति इखलासखान यालाच कैद केलें. कारण तो मलिक-अंबरानें आंखून दिलेल्या कार्यक्रमाप्रमाणें मोगलांशीं झगडत होता. इतर सरदारांचे तो फारसें ऐकत नसे. वर सांगितल्याप्रमाणें त्या सरदारांनीं इखलासखानास कैद करून निजामशहास कळविलें कीं, "मलिक-अंबरानेंहि आम्हांप्रमाणेंच रणांगणावर प्रत्यक्ष येऊन युद्धांत भाग घ्यावा." इतकेंच करून ते न थांबतां मोगलांस मिळण्याचाहि ते प्रयत्न करूं लागले. तें पाहून मोगलांकडून त्यांना कांहीं जहागीरहि देण्यांत आली. या निजामशाही सरदारांनीं मलिक-अंबराविरुद्ध मोगलांस कसें साह्य केलें तें मागें (प्रकरण ६ कलम ३) सांगितलेंच आहे. या साह्यानें मलिक-अंबराचे दहा हजार तरुण हबशी घोडेस्वार आपल्या घोड्यांसुद्धां गाळांत रुतून तोफांच्या तोंडीं बळी पडले.

**२. आदिलशहाची कृपाः—** आपल्यामधील फुटून गेलेल्या हबशी सरदारांचें हें अघोर घरभेदेपणाचें कृत्य मलिक-

अंबरानें आदिलशहास कळवून त्याच्या साह्याची मागणी केली. ती पाहतांच आदिलशहानें मुल्लाबाबा (मुल्ला महंमद लारी) याला सैन्यासह पाठविलें. मोगलांचा सेनापति (मिर्झा इरजखान) यानें या मुल्लाबावाला खूष करण्याचा प्रयत्न चालविला. तो याला काका म्हणूनच हांका मारूं लागला, त्यामुळें मुल्ला बाबाबद्दल मलिक-अंबराला संशय येऊन त्याला परत पाठ-विण्याची व्यवस्था त्यानें केली. तो परत गेल्यावर त्याची तिकडेस जी जहागीर होती ती आदिलशहानें दोन वर्षें जप्त केली; कारण आदिलशहा हा मलिक-अंबरास राजी ठेविण्याचा प्रयत्न करीत असे. याप्रमाणें दक्षिणेंत कारस्थानें चालत होतीं त्याच वेळीं दिल्लीमध्यें एक निराळेंच राजकारण उपस्थित झालें. ते म्हणजे शहाजादा शहाजहान याच्या बंडाचा मोड कसा करावा याची चर्चा व व्यवस्था हें होय. तो प्रकार वाचकांच्या लक्षांत येण्यासाठीं त्याचा थोडा विस्तृत वृत्तांत निवेदन करूं. मलिक-अंबराच्या धामधुमीच्या प्रसंगांत शहाजहान याला दक्षिणेंत पाठविण्याचें घाटत होतेंच. त्याच वेळीं जहांगीर याची बेगम नूरजहान हिचाहि कांहीं राजकारणी बेत चालत होता. तो काय हें सांगतों.

## २. नूरजहानचें राजकारण व शहाजहानचें बंड:—

सन १६२३ मध्यें शहाजादा शहाजहान मांडूस असतांना दिल्ली येथें नूरजहानच्या राजकारणाची वार्ता त्यास कळली व त्यानें एकदम बंड उभारिलें. या बंडांत त्याला अनेक नामांकित सरदारांचें साह्य होतें. त्या सरदारांत जाधवराव व उदयराम यांचींहि नांवें आढळतात. शहाजहान यानें महाराष्ट्रांत पुष्कळ दिवस सत्ता गाजविली व पराक्रमहि केले, त्यामुळें तिकडेस त्याची चांगलीच प्रसिद्धी होती. शहाजहान यानें बंड उभारिलेलें ऐकतांच त्याच्या पारिपत्यासाठीं महाबतखान या प्रख्यात सेनापतीच्या नेतृत्वाखालीं फार मोठी फौज नूरजहानच्या आज्ञेनें पाठविण्यांत आली. शहाजहान यानें या प्रसंगीं मलिक-अंबराचें साह्य मागितलें. परंतु अफाट मोगली फौज व तिच्यावरील पराक्रमी सेनापति महाबतखान यांचें अरिष्ट आपणावर ओढून घेण्याइतका अदूरदर्शी मुत्सद्दी आपला मलिक-अंबर नव्हता. शिवाय याच सुमारास तो विजापुरच्या आदिलशहावर स्वारी करण्याच्या विचारांत होता. त्यानें दूरवर विचार करून व शहाजहानची अडचण पाहून त्याचा जो वकील मलिक-अंबराकडेस आला होता त्यासच आदिलशहाकडेस पाठविलें. मात्र आपणहि त्यास साह्य करूं असेंहि सूचविलें.

**४. तिघांचे डावपेंचः**—त्या वकीलानें शहाजहानची

मागणी आदिलशहास निवेदन केली; परंतु आदिलशहानें तिकडे लक्षच दिलें नाहीं. मलिक-अंबर व आदिलशहा हे एकमेकांचा पाडाव करण्याच्या विचारांत या वेळीं होते, त्यामुळें त्या दोघांनाही मोगलांच्या साह्याची अपेक्षा होती. मलिक-अंबरानें महाबतखानास असें कळविलें कीं, "मोगली बादशाहींतून आपणास विजापुरकर आदिलशहाविरुद्ध साह्य मिळत असेल तर दौलताबादपर्यंत आपण येऊन दरबारास हजर होऊं; आपला एक मुलगा मोगलांच्या पदरीं नोकरीस ठेवूं व आपण स्वतः मोगली सत्तेशीं इमानेंइतबारें वागूं." आदिलशहानेंहि असेंच कांहीं आमिष दाखविलें. महाबतखान हा या वेळीं शहाजहानचें बंड मोडण्यासाठीं दक्षिणेंत आला होता. तो स्वतः मोठा मुत्सद्दी व राजकारणी सेनापति असल्यानें, शहाजहानचें बंड शमेपर्यंत त्या दोघांच्याहि मागण्यांचा निकाल न देतां दोघांनाहि झुलवीत ठेवून स्वतः मात्र सावध राहिला. कारण त्याला हें ठाऊक होतें कीं, ज्या पक्षाला तो साह्य न करितां दूर लोटून देईल तो पक्ष शहाजहानला मिळून त्याच्या बंडाला मात्र जोर आणील. सारांश, शहाजहानची धामधुम चालू असेपर्यंत महाबतखानानें मलिक-अंबर व विजापुरकर आदिलशहा या दोघांनाहि झुलवीत ठेविलें. पुढें शहाजहान गोवळकोंड्याच्या कुतुबशाहीकडे वळला. तें पाहतांच महाबतखानानें आदिलशहाची मागणी कबूल केली.

आदिलशहाला हें कळतांच त्यानें पांच हजार स्वारांची फौज महाबतखानाकडेस नोकरीसाठीं पाठविली. याप्रमाणें आदिलशहा व मोगल हे एक झालेले पाहतांच मलिक-अंबरास मोठाच धसका बसला. त्यानें एकदम खडकीहून आपली वसती उठविली व दौलताबादेच्या किल्ल्यांत आपलें कुटुंब नेऊन ठेविलें. याप्रमाणें कुटुंबाची सुरक्षितता करून त्यानें फौजेसह गोवळकोंड्याकडेस मोर्चा वळविला आणि असें प्रसिद्ध केलें कीं, 'वार्षिक खंडणी वसूल करण्यासाठीं आपण तिकडे जात आहोंत.' परंतु अंतस्थ हेतु हाच कीं, गोवळकोंड्याच्या कुतुबशहास (कुतुबुल्मुल्क यास) चांगली दहशत दाखवावी.

**५. मलिक-अंबराचा विजापुराला वेढा:**—मलिक-अंबर यानें आपल्या अंगच्या चातुर्यानें व कौशल्यानें मागील दोन वर्षांची तुंबलेली खंडणी गोवळकोंडेकरांकडून एकदम वसूल केली व मोठमोठ्या मजला मारून बेदर येथें विजापुरी फौजेचा पराजय केला. याप्रमाणें पराक्रम गाजवून त्यानें बेदर शहर लुटलें व विजापुरावर चाल केली. तें पाहतांच आदिलशहानें महाबतखानास कळवून आपली पांच हजार फौज परत बोलाविली व अधिक साह्य पाठविण्याची विनंति केली. याप्रमाणें मधूनच फौज परत बोलाविल्यामुळें आदिलशहानें बारा लाख

रुपये दंडादाखल महाबतखानाला दिले. त्यानेंहि मिळेल तेवढी मराठी फौज मलिक-अंबरावर पाठविण्याचें ठरवून त्याप्रमाणें व्यवस्था केली.

**६. मलिक-अंबर अहमदनगरास परत येतो :—** याप्रमाणें आदिलशाही व मोगली फौजा एकत्र होऊन मोठ्या जोरानें आपल्यावर चालून येत आहेत असें पाहून मलिक-अंबरहि गडबडला व त्यानें तहाचें बोलणें सुरू केलें. त्यानें मोगलांस असें कळविलें कीं, आदिलशहा व निजामुल्मुल्क यांना आपले तंटे स्वतंत्रपणें मिटवूं द्यावेत अथवा तंडूं द्यावेत, मोगलांनीं त्यांत मध्यस्थी करूं नये. परंतु मलिक-अंबर याचा हा युक्तिवाद मोगलांनीं न ऐकतां त्यास दडपून टाकण्याचा प्रयत्न जोरानें सुरूच ठेविला. हें पाहून मलिक-अंबरानें विजापुरचा वेढा उठविला व परत आपल्या अहंमदनगराकडेस प्रयाण केलें. मोगल व आदिलशहा हे एकत्र झाल्यानें फार बलवान झाले आहेत व ते आपणांस चिरडून टाकतील असें मलिक-अंबर यास निश्चितपणें वाटत असल्यानें त्यानें त्यांच्याशीं शांततेच्या तहाचें बोलणें मोठ्या नेटानें सुरू केलें. परंतु आदिलशहाचा सरदार मुल्ला महंमद लारी व मोगलांचा सरदार लस्करखान यांनीं तें तहाचें बोलणें धुडकावून देऊन मलिक-

अंबराच्या सैन्यास चेपण्यासच जोरानें सुरवात केली. याप्रमाणें प्रकार सुरू होतांच मलिक-अंबराचें सैन्य अहंमदनगरच्या म्हणजे आपल्याच निजामशाही मुलुखांत येऊन दाखल झालें. आपण आपल्या राज्यांत आलों असून आपले शत्रु आदिलशाहा व मोगल हे आपणांस वेढा घालून चेपीत आहेत हें पाहून मलिक-अंबरानें आपलें सर्व चातुर्य, आपला उत्साह, आपलें धैर्य व आपली साधनसंपन्नता यांचा उपयोग करून आपलें बुद्धिसर्वस्व पणास लाविलें.

**७. भाटवडीचें युद्ध :—** वर सांगितल्याप्रमाणें मलिक-अंबर भावी युद्धाची सिद्धता करीत होता तेव्हां आदिलशाही व मोगली फौजा अहंमदनगरपासून पांच कोसावर असलेल्या भाटवडी गांवीं मुक्काम करून राहिल्या होत्या. मलिक-अंबरानें सर्व सिद्धता होतांच एकदम त्या संयुक्त सैन्यावर छापा घालून त्याची दाणादाण उडवून दिली. त्यांत आदिलशाहाचा सेनापति मुल्ला महंमद लारी हा कामास आला. जाधवराव व उदीराम हे तर पळूनच गेले. पांच-पंचवीस सरदार कैद झाले, कित्येक मारले गेले व कांहीं मोठ्या मिनतवारीनें पळून गेले. या लढाईस भाटवडीचें युद्ध असें म्हणतात. यांत मलिक-अंबर विजयी झाला. त्यानें स्वतःच्या व अहंमदनगराच्या रक्षणासाठीं कांहीं फौज

ठेवून बाकीच्या फौजेसह तो विजापुरावर चालून गेला. विजापुरचा सर्व प्रदेश त्यानें आपल्या ताब्यांत घेतला व याकुबखानाच्या हाताखालीं दहा हजार फौज देऊन त्यास बऱ्हाणपुरावर पाठविलें. या फौजेनें 'मलकापुरास' म्हणजे बऱ्हाणपुरापासून दहा कोसावर आपला तळ ठेविला. बऱ्हाणपुराचा अधिकारी सरबुलंदराय यानें युद्धाची सिद्धता केली, परंतु त्याला मदत येईपर्यंत थांबण्यास सांगितलें असल्यामुळें त्यानें बऱ्हाणपुर येथें किल्ल्यांत जाऊन बंदोबस्त करून ठेविला. इकडे मलिक-अंबरानें दौलताबादेहून तोफा मागविल्या व सोलापुरास वेढा घालून हल्लाही केला नि तें आपल्या ताब्यांत घेतलें. या सोलापुरावर आदिलशहा व निजामशहा या दोघांचाहि सारखाच डोळा होता आणि यामुळेंच त्या दोघांत नेहमीं लढाया होत.

**८. मलिक-अंबर व शहाजहान यांची मैत्री :—** याप्रमाणें मलिक-अंबरानें निजामशाहीच्या वतीनें आदिलशाहीवर मारा चालवून आदिलशाही प्रदेश काबीज करण्याचा सपाटा चालविला होता, त्याच वेळीं शहाजादा शहाजहान, ओरीसा, तेलंगण, गोवळकोंडा या बाजूनें निजामशाही प्रदेशांत येऊन दाखल झाला. या वेळीं त्यानें आपला बाप जहांगीर याच्याविरुद्ध बंड केलें होतें व त्याच्या पारिपत्यासाठीं बादशहानें

महाबतखानास पाठविल्यावर आदिलशहा त्या महाबतखानास मिळाला होता. म्हणजे महाबतखान व आदिलशहा हे दोघेहि शहाजहानचें पारिपत्य करण्याच्या प्रयत्नांत होते हें मागें सांगितलेंच आहे. शहाजहान याप्रमाणें संकटांत असतांना तो निजामशाहीमध्यें आला. मलिक-अंबर व मोगली बादशाही यांचें बिनसलें होतें हें मागें (पृष्ठ ६४ वर) सांगितलेंच आहे. शहाजहान व मलिक-अंबर यांचें हाडवैरच होतें, पण मोगलाई-विरुद्ध हे दोघेहि झाल्यामुळें या दोघांची एकी सहज जुळून आली. या तहांत असें ठरलें कीं, मलिक-अंबरानें याकुबखान याला बऱ्हाणपुरला वेढा घालण्यास पाठविलें होतें त्याच्या सहाय्याला शहाजहान यानें जावें. बऱ्हाणपुरचा राजपुत राजा रावरतन याला मोगल बादशाही फौजेचें सहाय्य होतें. शहाजहान यानें बऱ्हाणपुरावर जोराचा मारा केला व किल्ला आपल्या स्वाधीनहि करून घेतला असता, पण इतक्यांत शहाजादा पर्विज व महाबत येऊन पोंचले त्यामुळें जयाचें पारडें फिरलें. तें कसें हें सांगण्यापूर्वीं मलिक-अंबर व आदिलशहा यांचे संबंध सांगतों.

**९. आदिलशहा व मोगल यांचें सख्य :**—या सुमारास म्हणजे सन १६२४ मध्यें अंबरासंबंधानें आदिल-

शहास नाराजी होऊं लागली होती. त्याला असें वाटूं लागलें कीं, अंबर हा वाईट वागणुकीचा असून मोठा अभिमानी व उद्धटहि आहे. शहाजहान यानें बंड केल्यामुळें जहांगिरानें शहाजादा पर्विज यास दक्षिणेंत पाठविलें होतें हें मागें सांगितलेंच आहे. पर्विज यानें, उत्तरेस अलाहाबादेकडेस जाण्यापूर्वीं आदिलशहाशीं मैत्री संपादन केली. आदिलशहानेंहि आपला एक हस्तक पर्विजकडे पाठविला व मैत्री जोडण्याची उत्सुकता दाखविली. हें पाहून पर्विजलाहि फार आनंद झाला व त्यानें पदरचे सगळे मोगली सरदार त्या हस्तकाच्या तैनातीस दिले. या सरदारांत जाधवराव या सरदाराचें नांव आहे व तो सन १६२४ पूर्वींच निजामशाही सोडून मोगलांस मिळाला होता. (शहाजी भोसले व बाबाजी काटे अशीं आणखी दोन मराठा सरदारांचीं नांवेंहि त्या यादींत आहेत. परंतु तीं चुकीचीं दिसतात. कारण बाबाजी काटे हा सन १६१६ मध्येंच मरण पावला होता व शहाजी केव्हांहि मोगलांकडेस गेलाच नाहीं.) हे सर्व सरदार अंबराचा फार द्वेष करीत असत व वारंवार म्हणत कीं, "आतां मलिक-अंबर जाणार कुठें? रेड्यावर त्याची वरात काढूं."

१०. **इतर लढाया :**—मोगलांचा शहाजादा पर्विज

याजकडेस आदिलशहानें जो आपला सरदार पाठविला होता तो मुल्ला महंमद होय. आदिलशाही व मोगली फौज एक होऊन त्यांनीं दक्षिणेवर म्हणजे निजामशाहीवर स्वारी करण्यासाठीं कूच केलें व पर्विज मात्र अलाहाबादेकडेस निघून गेला. आदिलशहानें मुल्ला महंमद लारी यास परत बोलावून घ्यावें म्हणून अंबरानें त्यांची प्रार्थना केली, पण ती व्यर्थ गेली. पुढें अंबरानें गोवळकोंड्यावर स्वारी केली व ठरलेली खंडणी वसूल केली. नंतर अंबरानें नवरसपुरावर स्वारी केली. अंबरानें नवरसपुर येथें मुक्काम करून विजापुरच्या आदिलशहाशीं तह करण्याचा पुनः प्रयत्न केला, पण व्यर्थ झाला. इतक्यांत एका रोगाच्या साथीस अंबराच्या सैन्यांतील पांचशे घोडे एका रात्रींत बळी पडले. याप्रमाणें अंबर संकटांत सांपडला होता, इतक्यांत मुल्ला महंमद लारी व मोगली फौज त्यावर चालून आली.

**११. अंबराचें पलायन:**—आदिलशहानें आणखी कांहीं सरदार व फौज अंबरावर पाठविली. त्यामुळें एका बाजूनें आदिलशाही व मोगली फौज व दुसऱ्या बाजूनें फक्त आदिलशाही फौज यांच्या मध्यभागीं अंबर व त्याची थोडीशी फौज यांचा कोंडमारा झाला. हा बिकट प्रसंग पाहून निवडक

लोकांनिशी अंबर तेथून निसटला व जवळच असलेल्या मजबूत भाटवडी किल्ल्यांत आश्रयास गेला. भाटवडीचें तळें त्यानें फोडून टाकून आसपासचा प्रदेश अगदीं जलमय केला. त्यामुळें सर्वत्र चिखल व शेवाळ पसरून मोगली व आदिल-शाही फौज कुंठित झाली. तें पाहून अंबर यास मोठा धीर आला.

**१२. अंबराचा धाकः—** मलिक-अंबर हा वर सांगितल्याप्रमाणें संग्रामांतून भाटवडीच्या किल्ल्यांत पळून गेल्यावर मोगल व आदिलशहा यांचें संयुक्त सैन्य विजापुरास गेलें. तेथें आदिलशहानें कांहीं मोगली सरदारांचा सन्मान केला. सर्वांचा सन्मान न झाल्यामुळें कांहीं सरदार नाराज झाले व त्यांनीं आदिलशहाशीं परकेपणानें वागण्यास सुरवात केली. तथापि अंबराच्या पाठलागावर हीं—आदिलशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही व मोगली अशीं—तीनहि सैन्यें होतीं. पावसाळा सुरू झाल्यानें फौजांच्या हालचालीस बरीच अडचण आली. दोन-तीन दिवस मोगली व आदिलशाही फौजेस घासदाण्यावांचून काढावे लागले. माणसें व जनावरें यांना हातपाय हालविण्याचीहि शक्ति राहिली नाहीं. आदिलशहानें थोडें द्रव्य व घासदाणा कांहीं लोकांबरोबर पाठविला, परंतु अंबराच्या धास्तीनें तोहि तेथें

जाऊं शकला नाहीं. याच सुमारास मोगली फौज उपासमारीनें कंटाळून फितूर होऊन अंबराकडेस आली व त्यानें तिला आपल्या पदरीं आश्रय दिला.

**१३. अंबराचे पराक्रम :**—मोगली फौज याप्रमाणें दिवसेंदिवस उपासमारीनें व्याकूळ होऊन मलिक-अंबरास मिळूं लागली त्यामुळें त्याच्या सैन्याची संख्या वाढूं लागली व मोगलांची कमी कमी होऊं लागली. रात्री-बेरात्रीं मलिक-अंबराची फौज मोगली फौजेवर छापे घालूं लागल्यानें मोगल अगदीं हैराण झाले. शेवटीं मलिक-अंबराची फौज फार मोठी झाली व त्यानें मोगली फौजेसमोरच दोन—तीन कोसांवर उघड्या मैदानांत निजामशाही झेंडा रोंवून उघडपणेंच तळ दिला. दुष्काळ, उपासमार, आपसांतील वैर आणि पावसाचा जोर यापुढें मोगली फौज अगदीं हैराण झाली होती व अंबराची फौज सुरक्षित असल्यानें मोगली फौजेचा नाश व पराजय हेहि प्रत्यक्ष दिसूं लागले व त्याप्रमाणें होऊन मोठमोठे मोगल सेनापती प्राणास मुकले व हजारो सैनिक कामास आले. साधारणतः कोणत्याहि युद्धांत मुख्यतः मनुष्यहानि ही ठरलेली असते. कुशल सेनापति असतात ते कमींत कमी मनुष्यहानि करून अधिकांत अधिक लाभ जोडितात. मनुष्यहानि ही

दोहों सैन्यांतील सैनिकांच्या प्राणांची हानिच असते, तथापि आपल्या सैन्यांतील कमी सैनिक कामास येऊन शत्रुपक्षांतील मात्र अधिक सैनिक परलोकास पाठवून जय मिळविणें हें कुशल सेनानीचें कर्तृत्व होय. अशा दृष्टीनें विचार केला म्हणजे मलिक-अंबराची योग्यता फार श्रेष्ठ ठरते. अधिक सैनिकांची हानि होण्याचे प्रसंग त्यानें मोठ्या युक्तीनें टाळून म्हणजे साम, दाम, दंड, भेद यांपैकीं प्रसंगविशेषीं अवश्य तो प्रयोग करून उपस्थित झालेलें संकट निवारिलें, असेंच त्याच्या चरित्रावरून दिसतें.

**१४. मलिक-अंबराचा मृत्यु :**—सन १६२४ मध्यें शाहाजादा पर्विज व महाबतखान हे दक्षिणेंतून परत फिरल्यावर मलिक-अंबरानें तापी नदीच्या दक्षिणेकडील सगळा मोगली प्रदेश जिंकून आपल्या सत्तेंत घेतला व अहंमदनगर आणि बऱ्हाणपुर या शहरांस वेढे दिले. परंतु शाहाजादा पर्विज व महाबतखान हे पुनः बऱ्हाणपुरास जाऊन उपस्थित झाल्यामुळें मलिक-अंबर व शाहाजहान यांस हार खावी लागली. इतक्यांत नूरजहानच्या कांहीं राजकीय भानगडीमुळें महाबत-खानास उत्तरेकडेस जावें लागलें व त्यामुळें मलिक-अंबरावरील संकट टळलें. जर महाबतखान हा दक्षिणेंतच राहिला असता

तर त्यानें मलिक-अंबराचा धुव्वा उडवून दिला असता. महावतखानानें खानजहान लोदी याला आपल्या ऐवजीं दक्षिणेंत ठेवून सन १६२६ च्या सुमारास तो दिल्लीकडेस निघून गेला. खानजहान लोदी हा दिल्लीचीं राजकारणें पाहून अगदीं गोंधळून गेला होता, इतकेंच नव्हे पण मलिक-अंबरासारख्या प्रख्यात व गनिमीकाव्यानें युद्ध करण्यांत निपुण अशा सेनापतीशीं सामना भिडविण्यास माहबतखानासारखा उत्साह, त्यास असलेल्या साधनांचा विपुल पुरवठा व त्याच्या अंगचें युद्धकौशल्य हीं खानजहान लोदीच्या अंगीं नसल्यानें त्याची अगदीं गाळण उडाली. हें युद्ध चालूं असतांनाच तारीख १४ माहे मे सन १६२६ रोजीं मलिक-अंबर मरण पावला. त्यावेळीं त्याचें वय ऐशीं वर्षांचें होतें असें लिहिलेलें आढळतें. परंतु आपण जो जन्मशक कल्पिला आहे त्यावरून त्याचें वय ८६ वर्षांचें ठरतें. मलिक-अंबराच्या कबरी रोजा व अंबरापुर अशा दोन गांवीं आहेत. तो वारला रोजा येथें, त्यामुळें तेथें एक कबर झालीच; पण मृत्यूनंतर त्याच्या पोटांतून कोथळा व आंतडी काढून तीं अंबरापुरास नेली व त्यावर तेथें एक कबर उभारलीं; त्यामुळें त्याच्या दोन कबरी आज अस्तित्वांत आहेत. असेंच दुसरें एक उदाहरण औरंगजेबाचें आहे. त्याच्याहि दोन कबरी आहेत; तो निवर्तला अहंमदनगरास म्हणून तेथें एक व

दुसरी रोजा तेथें एक. असो. जर मलिक-अंबर आणखी कांहीं काळ जगला असता तर खानजहान लोदीची अगदीं फटफजितीच झाली असती.

१५. योग्यता:—मलिक-अंबराच्या मृत्यूमुळें दक्षिणेंतील परिस्थिति एकदम बदलून गेली. त्याच्या मृत्युमुळें दक्षिणेचें जेवढें नुकसान झालें तेवढें इतर कोणाच्याहि मरणामुळें तोंपर्यंत झालें नव्हतें. मोगली इतिहासकार मोतामदखान हा आपल्या इतिहासांत मलिक-अंबराची स्तुति अशी केव्हांहि करीत नाहीं. इतकेंच नव्हें पण "सीदी, अबीसीनियांतील गुलाम" इत्यादि प्रकारचीच शब्दयोजना करितो. परंतु तो मोतामदखानसुद्धां मलिक-अंबराच्या मृत्यूनंतर त्याची थोरवी मोठ्या गौरवपूर्ण भाषत लिहितो. तो म्हणतो, "राजकारण, युद्धकारण, व्यवस्थित आज्ञापन, दृढ सारासारविचार यांमध्यें मलिक-अंबराला कोणीहि प्रतिस्पर्धी नव्हता अथवा त्याची बरोबरीहि करण्यास कोणी समर्थ नव्हता. गनिमीकाव्याच्या युद्धकलेंत तो फार निष्णात होता. अशा युद्धाला दक्षिणेंत बारगीरगिरी असें म्हणतात. त्या—म्हणजे दक्षिणेकडील—देशाचा (म्हणजे लोकांचा) जुलमी स्वभाव त्यानें दडपून टाकिला व आपला उच्च दर्जा शेवटपर्यंत संभाळिला. इतिहासामध्यें असा

दुसरा अबिसिनीयाचा गुलाम प्रख्यात असल्याचें दिसत नाहीं." अशा प्रकारची स्तुति मोतामदखानानें मलिक-अंबराची केली आहे.

**१६. मलिक-अंबर याचे मुलगे :**—फातखान व चेंगिसखान असे दोन मुलगे मलिक-अंबर यास होते व मलिक-अंबराच्या मागें फातखानच त्याच्या जागीं आला. मलिक-अंबर याचा विशेष विश्वास मात्र याकुबखान नांवाच्या एका सरदारावर होता. हा याकुबखानहि अबीसीनियाचा गुलामच होता. मलिक-अंबरानंतर तोच मुख्य सेनापति झाला. आपल्या निजामशाहींतील बंडाळी मोडणें व मोगली साम्राज्यास टक्कर देणें असें दुहेरी कार्य करण्यास मलिक-अंबरासारखें सामर्थ्य फातखान अथवा याकुबखान यांच्यामध्यें नव्हतें. त्यामुळें पुढें निजामशाही कमकुवत होत गेली. परंतु तो वृत्तांत आपणांस येथें सांगावयाचा नाहीं.

# प्रकरण ८ वें

## सिंहावलोकन

इ. स. १५४०–१६२६

मुद्दे—१. प्रारंभींची हकीकत. २. प्रतिस्पर्ध्यांशीं डावपेंच. ३. गनिमीकाव्याचें उत्पादकत्व. ४. मराठे सरदारांचें चापल्य. ५. तोडरमल्लाशीं तुलना. ६. जमिनीवरील सारा रोकड घेण्याची सुरुवात. ७. इतर माहिती. ८. न्यायबुद्धीची प्रखरता. ९. मलिक-अंबराच्या मुलांचें नादानत्व. १०. अभिप्राय. ११. मामूल जहागीर. १२. रजाचा गज.

**१. प्रारंभींची हकीकत:**—आतांपर्यंत सात प्रकरणांत मलिक-अंबराचें चरित्र सांगितलें. आतां आपण त्या सर्व कथनाचा मथितार्थ पाहूं. मलिक-अंबर हा जातीनें सीदी होता. मलिक नांवाच्या कुळांत अथवा शाखेंत जो उत्पन्न होतो त्याला 'मलिक' हें पद प्रथम लागतें. यावरून या पुरुषाचें नांव अंबर व त्याचें कुळ मलिक असावें. या दोहोंचा संधि होऊन मलिक-अंबर हें नांव रूढ झालें. याच्या मुलाला

मलिक फातखान म्हणत असत (पृष्ठ ३६ पहा). यावरून मलिक हें शाखानांव असावें असें निश्चित दिसतें. याचा जन्म सन १५४० च्या सुमारास बगदाद येथें झाला असावा असा तर्क आहे. हा जन्मतः गुलाम होता. हा दहा वर्षांचा झाल्यावर यास मीर कासिम या सरदारानें विकत घेतलें व वर्ष सहा महिन्यांतच चेंघिसखान या नांवाच्या दुसऱ्या एका मोठ्या सरदारास विकून टाकिलें. याच्याचजवळ हा राजकारण शिकला व मुलकी हिशेबाचें कामहि पढला. निजामशाहीच्या अवनतावस्थेंत चांदबीबी या शूर स्त्रीनें त्या राज्याचें संरक्षण सन १५८४ पासून सन १५९९ पर्यंत मोठ्या बहादुरीनें केलें व याच काळामध्यें मलिक-अंबर पुढें सरसावला. चांदबीबीच्या खुनानंतर लगेच सन १६०० मध्यें मलिक-अंबरानें खडकी हें शहर वसवून तेथें निजामशाही राज्याची स्थापना केली. निजामशाहीची मूळची राजधानी अहंमदनगर हें शहर मोगलांनीं घेतल्यावर त्यांनीं तेथें आपली सत्ता प्रस्थापित केली. मलिक-अंबर यानें आदिलशाही व कुतुबशाही राज्यांच्या सरहद्दीपर्यंत अहंमदनगरापासून ८ मैल अलीकडे व वर उत्तरेस चेउल बंदरापर्यंत व दक्षिणेस दौलताबादेपर्यंत सर्व प्रांत निजामशाहीसत्तेखालीं घेतला.

२. **प्रतिस्पर्ध्यांशीं डावपेंच** :—याच वेळीं मीया

राजू नांवाचा एक निजामशाही सरदार पुढें आला व त्यानेंहि मलिक-अंबराप्रमाणेंच कांहीं प्रदेशावर निजामशाही सत्ता प्रस्थापित केली. परंतु पुढें लवकरच मलिक-अंबर व राजू यांच्यामध्यें वैर उत्पन्न होऊन सन १६०७ मध्यें मलिक-अंबरानें राजूस कैद केलें व निजामशाही कारभार एकतंत्री सुरू केला.

**२. गनिमीकाव्याचें उत्पादकत्व :**—निजामशाही-वर मुख्यत: दिल्लीच्या मोगलांची नजर फार असल्यानें मलिक-अंबराला सन १६०७ पासून पुढें त्याच्या अंतापर्यंत—म्हणजे सुमारें वीस वर्षेपर्यंत—सतत लढाया द्याव्या लागल्या. आदिलशहा सारखे इतर राजे व मलिक-अंबराचे कांहीं एतद्देशीय प्रतिस्पर्धी मोगलांसच मिळाल्यानें मलिक-अंबरावर फार संकटें आलीं, परंतु त्या सर्वांचा निरास करून त्यानें निजामशाही राज्य आमरण वांचविलें यांत संशय नाहीं. गनिमीकाव्याच्या लढाईची कर्तबगारी प्रथम मलिक-अंबरानेंच जनतेस पटविली. जाधवराव, शहाजी भोसले इत्यादि मराठे वीर याच सुमारास मलिक-अंबराच्या तालमींत गनिमीकाव्याची युद्धकला शिकून निष्णात झाले. मलिक-अंबरानें जें मराठी सैन्य मोगलांविरुद्ध सिद्ध ठेविलें होतें त्यास 'बरगे-लष्कर' असें म्हणत असत. कारण बरगे (बेडर) या जातीचेच लोक विशेषत: या लष्करांत असत.

**४. मराठे सरदारांचें चापल्य** :— गनिमीकाव्याच्या लढाईला बिजलीसारखी चपलता लागते व मराठ्यांमध्यें ती पूर्णपणें असल्यानें त्यांनीं मोगली सैन्यावर प्रत्येक युद्धांत मात केल्याचें दिसतें. मोगली सेनापति शहाजहान लोदी यानें पुढें सन १६२१ पासून मराठ्यांना निजामशाहींतून फोडून आपणाकडेस वळविण्याचा प्रयत्न चालविला होता. आणि याचमुळें जाधवरावासारखे सरदार मोठमोठ्या मनसबीच्या आशेनें मोगलांस मिळाले. शहाजी भोसले मात्र मलिक-अंबराकडेसच राहिला होता आणि शहाजी व जाधवराव यांची युद्धें झाल्याचें जें वर्णन येतें तें सन १६२१ च्या नंतरचेंच होय. सन १६२७ मध्यें शिवाजी महाराजांच्या जन्माच्या सुमारास जाधवराव व शहाजी यांचें जें युद्ध झालें तें याच प्रकारचें होय. जाधवरावाचे कांहीं वंशजहि पुढें मोगलांच्या पदरींच राहिले होते.

**५. तोडरमल्लाशीं तुलना** :—दिल्लीचे मोगल व विजापुरचे आदिलशहा व इतर कांहीं सरदार या सर्वांशीं मलिक-अंबरानें टक्कर देऊन निजामशाहींचें पुनरुज्जीवन केलें यांतच त्याची कर्तृत्वशक्ति प्रत्ययास येते. मलिक-अंबर हा जसा रणधुरंधर योद्धा होता तसाच तो मोठा राजकारणपटुहि होता. जमीन-महसुलाची पद्धति राजा तोडरमल यानें मोगली राज्यांत

अस्तित्वांत आणिली तशीच मलिक-अंबरानें ती महाराष्ट्रामध्यें प्रस्थापित केली. युद्धप्रसंग चालू असतांहि याप्रमाणें शेतकरी वर्गाच्या सुखाकडेसच लक्ष देणारा मलिक-अंबर धन्य होय यांत संशय नाहीं. मलिक-अंबराचें हें धोरण पुढें मराठेशाहींत कारणपरत्वें न राहिल्यामुळें तिला लुटारू ही संज्ञा प्राप्त झाली.

**६. जमिनीवरील सारा रोकड घेण्याची सुरुवात :–** मलिक-अंबरानें जमिनीची मापणी करविली. बागायत व जिरायत असे मुख्य दोन प्रकार ठरवून त्यांतहि चार प्रती मुक्रर केल्या. जमिनीच्या उत्पन्नाचा २/५ भाग सरकारांत धान्यरूपानें कर म्हणून घेण्याचें मुक्रर केलें. ग्रामसंस्थांचें पुनरुज्जीवन करून पाटिल-कुळकर्ण्यांचीं वतनें नक्की केलीं. पुढें, धान्यरूपानें कांहीं भाग कर म्हणून घेणें हें उभयपक्षीं त्रासदायक होत आहे हें पाहून ज्या त्या जमिनींतील एकंदर सर्व धान्याची उचक किंमत करून तिचा तिसरा हिस्सा रोकड घेण्याची पद्धति सन १६१४ च्या सुमारास त्यानें सुरू केली. मोगलाईमध्यें तोडरमल्लानें कायम धारेबंदी केली आहे ती पद्धति मलिक-अंबर यास मान्य नव्हती म्हणून त्यानें ती महाराष्ट्रांत मुळींच आणिली नाहीं. त्याच्या हयातींत सतत लढाया सुरू असूनहि सरकारी खजिना कधींहि सर्वस्वी रिकामा झाला नाहीं.

पूर्वी जमिनीचा सारा धान्याच्या रूपांतच घेत असत. हिंदुस्थानांत लहान-मोठी हजारों संस्थानें असल्यानें जमिनीचा कर धान्यरूपांत घेणेंच सोयीचें असे. धान्याचे प्रकार व प्रत्येक प्रकारांतील अनेक पोटभेद असल्यानें संरकारी कोठारांतून ते सगळे निरनिराळे ठेवावे लागत, त्यामुळें सरकारी कोठारेंहि पुष्कळच ठेविणें अवश्य असे. सरकारी नोकरांना पगार द्यावयाचा तो या धान्याच्या रूपांतच द्यावा लागे. दामाजीपंतानें सरकारी धान्याची कोठारें दुष्काळग्रस्तांस वांटून दिल्याचें ऐतिहासिक कथानक प्रसिद्धच आहे. सारांश, धान्यरूपानेंच जमिनीचा कर भरणें ही प्राचीन रूढी असून शेतकऱ्यांना तीच फार हितावह होय. परंतु राजाचीं कर्तव्यें वाढल्यानें व राज्याचे संबंध दूरवर पसरूं लागल्यांवर नाण्यांची आवश्यकता भासूं लागली व शेतसाराहि नाण्यांतच घेणें अवश्य झालें. हे प्रश्न फार गुंतागुंतीचे असल्यानें त्यांची विशेष चर्चा येथें करीत नाहीं. शेरशहानें सोळाव्या शतकांत नाणें सुरूं केलें व शंभर वर्षांनींच मलिक-अंबरानें त्या नाण्याचा प्रसार महाराष्ट्रांत केला इतकाच मुद्दा आपल्या उपयोगाचा आहे.

७. इतर **माहिती**:—जहांगीरनाम्यामध्यें मलिक-अंबराबद्दल पुढील अर्थाचें वर्णन आहे:—"युद्धकला, सेनापतित्व,

व्यवहारज्ञान आणि राज्यशासन यांमध्यें मलिक-अंबराच्या तोडीचा दुसरा कोणीहि आढळत नाहीं. त्यानें दंगेखोर लोकांना धाकामध्यें ठेविलें आणि शेवटपर्यंत आपला मोठा दर्जा कायम राखून सन्मानानें आपली कारकीर्द संपविली. इतिहासामध्यें एक हबशी गुलाम एवढ्या मोठ्या पदावर चढल्याचें दुसरें उदाहरण नाहीं."

८. **न्यायबुद्धीची प्रखरता**:—मलिक-अंबर याची न्यायबुद्धि फार प्रखर असे. राज्यकारभारांत तो जातिभेद मानीत नसे. वसूलाचें काम ब्राह्मण कारकुन करीत असत. वरती देखरेख करणारे किंवा मुख्य अंमलदार मात्र मुसलमान असत. परधर्माविषयीं तो सहिष्णु असे. हिंदु-मुसलमान हे औरंगजेबी भेदभाव त्याच्या ठिकाणीं नव्हते. हिंदूंच्या देवस्थानांचें त्यानें रक्षण केलें व त्यांस कायमचीं उत्पन्नेंहि करून दिलीं. चिंचवडच्या मोरया देवास त्यानेंच कायमचें नवीन इनाम करून दिलें.

९. **मलिक-अंबराच्या मुलांचें नादानत्व**:—मलिक-अंबरास दोन मुलगे होते-एक फातखान व दुसरा चेंगिसखान. हें मागें सांगितलेंच आहे. मलिक-अंबराच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा फात-खान हा निजामशाही कारभार पाहूं लागला, परंतु त्याच्या ठिकाणीं

त्याच्या पित्याचें दूरदर्शित्व नसल्यानें निजामशाही दरबारांत मतभेद होऊन दुफळी माजली व फातखानाची सत्ता कमजोर झाली. तिचा फायदा घेऊन दुसऱ्या एका सरदारानें पुढारीपण स्वीकारून फातखानास दौलताबादच्या किल्ल्यावर कैदेंत ठेविलें. पुढें तेथून तो सुटल्यावर त्यानें (मूर्तिजानें) निजमाशहासच पकडून कैद केलें व विषप्रयोगानें ठार मारूनहि टाकिलें. ज्याच्या पित्यानें या मूर्तिजाला वाढविलें त्यानेंच (म्हणजे मलिक-अंबराच्या फातखान नांवाच्या मुलानें) त्याला (मूर्तिजाला) ठार मारावें याहून राक्षसी अधमपणा तो निराळा काय असणार ? पुढें लौकरच या बेबंदशाहीची खबर दिल्लीस गेल्यावर मोगलांनीं निजामशाहीवर स्वारी करून ती खालसा केली व तेथील बालनिजामशहास कैद करून दिल्लीस पाठवून दिलें. मलिक-अंबराचे मुलगे फातखान व चेंगिसखान हे पुढें मोठमोठ्या मनसबदाऱ्या घेऊन मोगलांच्या पदरीं नोकर राहिले. सारांश, मलिक-अंबराच्या मुलांनीं सर्व निजामशाही राज्य मोगलास अर्पण केलें.

१०. **अभिप्रायः**—मलिक-अंबर याच्या योग्यतेसंबंधानें डफ साहेब पुढें सांगितल्याप्रमाणें आपला अभिप्राय प्रकट करितात. "मलिक-अंबरानें दौलताबादेजवळ खडकी येथें

आपली राजधानी स्थापन केली व तेथें कित्येक सुंदर राजवाडे उभारले. (हेच राजवाडे मोगलांनीं जमीनदोस्त केल्याचा वृत्तांत मागें प्रकरण ६ परिच्छेद ७ मध्यें दर्शविला आहे. इ. स. १६२९ मधील खडकीची लढाई ती हीच होय.) त्यानें मोगल सैन्याचा वारंवार पराभव केला व अहंमदनगरचा किल्ला व वऱ्हाडांतील कांहीं प्रांत परत जिंकून घेतले. तो नेहमीं युद्धामध्यें गुंतलेला असे, तथापि त्या थोर पुरुषास शांततेच्या कालांतील गोष्टी व वसुली, राज्यसुधारणा करण्यास फुरसत मिळाली. त्यामुळें त्याचें नांव सुप्रसिद्ध योद्धा यापेक्षां उत्तम राज्यकर्ता या नात्यानें प्रत्येक गांवीं अधिक पूज्य होऊन राहिलें आहे. त्यानें मुख्यत्वें करून मक्त्याच्या वसुलाची पद्धति बंद केली व सर्व व्यवस्था ब्राह्मण लोकांच्या हातीं देऊन त्यांवर मुसलमान अंमलदारांची देखरेख ठेविली. गांवकामदारांच्या पद्धतीचा ऱ्हास झाला होता, तिचें त्यानें पुनरुज्जीवन केलें; आणि जमिनीच्या उत्पन्नाच्या प्रमाणावर नेमस्त आकार बसवून, धान्यरूपानें सारा घेण्याची पद्धति सुरूं केली. नंतर कांहीं वर्षांचा अनुभव पाहिल्यानंतर, जमिनीच्या प्रतिवार्षिक उत्पन्नावर द्रव्यरूपानें सारा घेण्याची रीत चालू केली. ह्या कारणामुळें त्याच्या ताब्यांतील मुलुखाची भरभराट झाली व लोकवसती वाढली; आणि राज्याचा खर्च मोठा होता, तरी उत्पन्नाचें

मान नेहमीं भरपूर राहिलें." हा इतिहासकार डफचा अभिप्राय निवेदन केला. इतरहि अनेक विद्वानांचे असेच अभिप्राय या थोर पुरुषासंबंधानें आहेत. पुण्याचे कलेक्टर मिस्टर रॉबर्टसन यांनीं एका अहवालांत मलिक-अंबरसंबंधानें गौरवपूर्ण उद्गार काढिले आहेत. ते म्हणतात, "प्रजाजनांचा हितकर्ता या नात्यानें मलिक-अंबराचें नांव आजहि (सन १८२०) दाक्षिणेमध्यें सर्वत्र प्रसिद्ध असून त्याचें बुद्धिवैभव हें या देशाला आदर्श वाटत आहे." जनरल ब्रिग्ज् यांनीं सुद्धां अशाच अर्थाचे उद्गार काढिले आहेत ते मूळांतूनच उद्धृत करितों. "The justice and wisdom of the Government of Malik-Ambar have become proverbial in the Deccan. He appears to have been the most enlightened financier of whom we read in the Indian history. (Briggs' Ferishta. Vol. III, Page 320.) इतका उत्तम राजकारणी होता तरी मलिक-अंबरास लिहितां-वाचतां येत होतें असें कोठेंहि म्हटल्याचें आढळत नाहीं. या बाबतींत तो अकबराप्रमाणेंच निरक्षर असावा.

**११. निजामशाहीचा अंत** :— मलिक-अंबर याच्या मृत्यूनंतर म्हणजे सन १६२६ नंतर निजामशाहीची काय

स्थिति झाली हें सांगणें क्रमप्राप्त आहे. मलिक-अंबराच्या मरणानंतर त्याचा मुलगा फातखान हा निजामशाहीचा कारभार कांहीं दिवस पहात होता. परंतु इतरांच्या सल्ल्यानें निजामशहानें त्यास प्रतिबंधांत ठेविलें. मलिक-अंबराच्या शिक्षेंत जीं माणसें योग्यतेस चढलीं होतीं त्यांत छत्रपति शिवाजी महाराजांचे तीर्थरूप शहाजी हे एक होते. त्या शहाजीनें पुढारपणा घेऊन निजामशाहीचा कारभार सुयंत्रित चालविला. त्याचा सासरा लखुजी जाधवराव हा पूर्वीच मोगलांकडेस फुटून गेला होता तोहि कांहीं विशेष मिळविण्याच्या आशेनें परत निजामशाहींत आला, परंतु तेथें त्याचा सन १६२९ मध्यें खूनच झाला. त्या धामधुमीच्या काळांत फौजबंद सरदार शक्य तो प्रांत बळकावून आपला अंमल गाजवीत असत. तोच प्रकार शहाजीनेंहि केला. मलिक-अंबराप्रमाणें शहाजीनेंहि निजामशाही गादीवर एक राजपुत्र स्थापिला होताच. त्यामुळें त्याला मोगलांशीं झगडा करणें भाग पडलें. विजापुरकरांनींहि शहाजीस मदत केली. त्यामुळें मोगली फौज अगदीं जेरीस आली. पुढें मोगल व आदिलशहा यांचा तह झाल्यानें शहाजी एकटाच पडला. त्यानंतर शहाजहान बादशहानें खुद्द निजामशहास पकडून आग्र्यास नेऊन कैदेंत ठेविलें व सन १६३७ मध्यें निजाम-

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नों. क्रं. ५१५९८



शाही सत्तेचा शेवट झाला. व शहाजी हा विजापुरकरांच्या पदरीं सरदारी करूं लागला. मलिक-अंबराच्या मृत्यूनंतर दहा-बारा वर्षांतच निजामशाहीचा अंत झाला !!

**१२. रजाचा गज** :—रजाचा गज झाल्याचीं जीं कांहीं तुरळक उदाहरणें आहेत त्यांत मलिक-अंबराचें उदाहरण लक्षांत भरण्यासारखें आहे. जन्मतः गुलाम व जातीनें हबशी पण त्यानें एवढी थोर कृति केली कीं तो मृत्यूसमयीं राज्यसंरक्षक बनला. देव, धर्म, दैव, आशीर्वाद यांमुळें प्रयत्न करणारास उत्साह येतो यांत संशय नाहीं; तथापि प्रयत्न हेंच यशाचें बीज होय हें विसरतां कामां नये आणि मलिक-अंबराच्या मृत्यूनंतर एकच वर्षांनीं छत्रपति शिवाजी महाराजांचा अवतार होऊन त्यांनीं पुढें स्वराज्य स्थापन केलें तो पराक्रम पाहून 'स क्षात्रधर्मस्य नवावतारः' असे उद्गार विद्वानांच्या वाणीला स्फुरूं लागले. गागाभट्ट हा प्रख्यात विद्वान तर शिवप्रभूबद्दल म्हणतो :— यत्पुण्यराशिरभवच्छिवराजनामा ।

यस्य प्रभावसविता क्रमते दिगन्तम् ॥

शिवप्रभूंचा स्वराज्यस्थापनेचा यत्न सिद्ध झालेला पाहून समर्थ रामदास म्हणतात— यत्न तो देव जाणावा !

—समाप्त—

1532

# श्रीसयाजी बालज्ञानमाला

## ऐतिहासिक चरित्रें

१ ( ४ ) **महाराणा प्रताप.** रमणलाल वसंतलाल देसाई, एम्. ए. ( १९१९–१९२२ ) ०–६–०

२ ( ८ ) **औरंगजेब.** मनसुखराम मोहनलाल पोटा, बी. ए. ( १९१९–१९२२ ) ०–६–०

३ ( १० ) **रणजितसिंह.** भरतराम भानुसुखराम महेता, ओ. टी. सी. ई. ( १९२०–१९२३ ) ०–६–०

४ ( ११ ) **श्रीहर्ष.** भरतराम भानुसुखराम महेता ( १९२०–१९२२ ) ०–६–०

५ ( १६ ) **बाल नेपोलियन.** दिनकरराय पुरुषोत्तमराय जोषीपुरा ( १९१९–१९२५ ) ०–६–०

६ ( १९ ) **श्रीहर्ष.** आनंदप्रिय आत्मारामजी, बी. ए., एल्‌एल्. बी. [ हिंदी ] ( १९२१ ) ०–८–०

७ ( २४ ) **लॉर्ड विलियम बेन्टिक.** हीरालाल हरजीवन गणात्रा बी. ए., एल्‌एल्. बी., सॉलिसिटर ( १९२२ ) ०–६–०

८ ( २५ ) **नाना फडनवीस**. रमणलाल वसंतलाल देसाई.
एम्. ए. ( १९२२ ) ०—६—०

९ ( २८ ) **महादजी सिंधिया**. वल्लभराय लालशंकर
छाया, बी. ए. ( १९२२ ) ०—६—०

१० ( ३४ ) **बाल बाबर**. मनसुखलाल मोहनलाल पोटा,
बी. ए. ( १९२३ ) ०—६—०

११ ( ४१ ) **विलियम युवर्ट ग्लॅडस्टन**. हीरालाल हरजीवन गणात्रा,
बी. ए., एल्एल्. बी., सॉलिसिटर ( १९२४ ) ०—६—०

१२ ( ४२ ) **शूरवीर शिवाजी**. भरतराम भानुसुखराम
महेता, ओ. टी. सी. ई. ( १९२४ ) ०—६—

१३ ( ४७ ) **छत्रपति संभाजी महाराज**. केशव मंगेश
रांगणेकर, बी. ए. [ **मराठी** ] ( १९२४ ) ०—६—

१४ ( ४८ ) **महाराणा प्रताप**. परशुराम गोविंद काटदरे
[ **मराठी** ] ०—६—

१५ ( ५१ ) **ड्यूक ऑफ वेलिंग्टन**. हीरालाल हरजीवन गणात्रा,
बी. ए. एल्एल्. बी., सॉलिसिटर ( १९२४ ) ०—६—

१६ ( ६४ ) **औरंगजेब**. आनंदप्रिय आत्माराम पंडित,
बी. ए. एल्एल्. बी. [ **हिंदी** ] ( १९२६ ) ०—८—

१७ ( ६६ ) **चक्रवर्ती अशोक**. हरिराय भगवंतराय बुच ०—६—

१८ ( ६७ ) **बाल बाबर**. विष्णु पांडुरंग नेने, बी. ए.
[मराठी] ०—६—

१९ (७७) **विल्यम एडवर्ड ग्लॅडस्टन**. विष्णु पांडुरंग नेने, बी. ए. [**मराठी**] (१९२७) ०-६-०

२० (८९) **अशोक.** विष्णु पांडुरंग नेने, बी. ए. [**मराठी**] ०-५-०

२१ (९७) **भावणा महाराजा.**—चंद्रशंकर म. भट्ट. ०-६-०

२२ (९८) **कोलम्बस**—(सचित्र) ०-६-०

२३ (१०३) **कर्ण**. कवि रामराव मार्तंड भांबुरकर [**मराठी**] ०-६-०

२४ (१०५) **रामदास**—कवि रामराव मार्तंड भांबुरकर [**मराठी**] ०-६-०

२५ (१०७) **झांशीची शूर राणी लक्ष्मीबाई.** श्रीमती लक्ष्मीबाई प्रधान [**मराठी**] (१९३३) ०-६-०

२६ (१०९) **भीष्म**. वि. वा. जोशी [**मराठी**] (१९३३) ०-३-०

२७ (११४) **एलिचपूर**. य. खु. देशपांडे [**मराठी**] (१९३४) ०-६-०

२८ (११५) **शङ्कधर**. दत्तात्रेय सीताराम पंगु, एम्. ए. राजाराम कॉलेज [**मराठी**] (१९३४) ०-४-०

२९ (१२४) **विमळशाह**. धीरजलाल टोकरशी शाह (१९३५) ०-६-०

३० (१३२) **वस्तुपाळ तेजपाळ**. धीरजलाल टोकरशी शाह (१९३५) ०-६-०

३१ (१३५) **मीराबाई**. सौ. पुष्पा र. वकील, बी. ए. (१९३५) ०-५-०

३२ (१३८) **हेमचंद्राचार्य.** पंडित बेचरदास दोशी (१९३५) ०—८—०

३३ (१४५) **चंद्रहास.** रा. सा. ईश्वरलाल खानसाहेब, बी. ए. (१९३७) ०—६—०

३४ (१४८) **महमद बेगडो.** प्रो. एम्. एफ्. लोखंडवाला, एम्. ए. (१९३७) ०—६—०

३५ (१५५) **सुलतान बहादुरशाह.** प्रो. एम्. एफ्. लोखंडवाला, एम्. ए. (१९३८) ०—६—०

३६ (१५६) **आनंदीबाई पेशवे.** चिं. ग. कर्वे, बी. ए. [मराठी] (१९४०) ०—६—०

३७ (१६३) **मल्हारराव होळकर.** के. मं. रांगणेकर, बी. ए. [मराठी] (१९४०) ०—६—०

३८ (१६५) **मलिक-अंबर.** वि. स. वाकसकर [मराठी] (१९४१) ०—६—०



श्रीसयाजी बालज्ञानमाला पुष्प १६५

# वि. स. वाकसकर संपादित ग्रंथ

(रावपुरा, बडोदें.)

१ राधेय–कर्ण चरित्र (महाभारताच्या आधारें) १-०-०

(इ. स. १९२१)

२ मित्र–चतुष्टय (रूपांतरित कादंबरी)

३ अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रें १-०-०

४ शिवाजी व शिवकाल (रूपांतर) २-४-०

५ शिवछत्रपतींची ९१ कलमी बखर २-०-०

६ तंजावरचे मराठे राजे (रूपांतर) १-९-०

७ बडोदें (शहराची ऐतिहासिक माहिती) ०-६-०

८ गायकवाड सरकार यांच्या राज्याचा इतिहास ०-५-०

९ दरुणी महाल (ऐतिहासिक राजस्त्रियांची सांपत्तिक स्थिति. अप्रसिद्ध)

१० बडोदें राज्य दफ्तरांतील ऐतिहासिक वेंचे (निवडक पत्रें)
(खास हुकुमानें हें संशोधनाचें काम केलें.)

ही पांचहि पुस्तकें बडोदें येथें राज्यदफ्तर कचेरींत मिळतात. परगांवीं पाठविणें असल्यास पोस्टखर्च प्रत्येकीं चार आणे

१४ अधिक भरावे लागतात.

| | | |
|---|---|---|
| खंड | १ ला | ०-१५-० |
| खंड | २ रा | ०-१५-० |
| खंड | ३ रा | १-३-० |
| खंड | ४ था | १-७-० |
| खंड | ५ वा | १-६-० |

१५ मलिक-अंबर (इ. स. १९४१) ०-६-०